।। विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।



कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर





शिक्षणमहर्षी कै.डॉ.ग.श्री. खैर
तथा अण्णासाहेब खैर

पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार


Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine **September 2017** - Pages - 52

संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे | कार्यकारी संपादक : प्राचार्य हणमंत भोसले

✲ पुणे ✲ वर्ष ६८ वे ✲ अंक ११ ✲ **सप्टेंबर २०१७** ✲ किंमत रु. १०/- ✲ वार्षिक वर्गणी रु. १००/-




महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे येथे दि. १५ ऑगस्ट २०१७ रोजी
७१ व्या स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण करताना
प्रमुख पाहुणे डॉ. वसंतराव वाघ, माजी प्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे
समवेत कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले,
कुलसचिव श्री. सुनील रेडेकर, संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, श्री. रमेश कुलकर्णी व श्री. कृष्णाजी कुलकर्णी,
महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्थेचे प्राचार्य पी. व्ही. शिंदे, प्रा. टी. आर. गोराणे, पर्यवेक्षक श्री. भा. ल. शेलार

## ⁂ गीतामहर्षी स्वर्गीय गुरूवर्य डॉ. अण्णासाहेब खैर स्मृति व्याख्यानमाला क्षणचित्रे ⁂



कार्यक्रमाच्या सुरवातीस
गुरुवर्य कै. अण्णासाहेब खैर यांच्या
प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना
सन्माननीय व्याख्याते
प. पू. स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज
(आचार्य किशोरजी व्यास),
समवेत कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे,
ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले,
कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर,
संचालक डॉ. निहार बाळिंबे,
कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे,
सूत्रसंचालिका सौ. सायली बापट




सन्माननीय व्याख्याते आचार्य किशोरजी व्यास यांचे स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, समवेत डावीकडून संचालक डॉ. निहार बाळिंबे, कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, प्राचार्य हणमंत भोसले, कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर,

'खरं तर योग दिवस म्हणजेच गीतादिवस'
या विषयावर प्रकट व्याख्यान देताना
प. पू. स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज
(आचार्य किशोरजी व्यास)



# पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष मा. दि. ज. तथा भाऊसाहेब खिलारे यांचे दुःखद निधन



माजी महापौर आणि पुणे विद्यार्थी गृहाचे अध्यक्ष दिवाकर ऊर्फ भाऊसाहेब खिलारे यांचे शनिवार दि. ९.९.२०१७ रोजी हृदयविकाराने दुःखद निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, चार मुली आणि नातवंडे असा परिवार आहे.

कै. मा. ना. विलासरावजी देशमुख पुणे विद्यार्थी गृहाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष असताना दि. १.४.२००१ पासून दि. २७.७.२०१३ पर्यंत दि. ज. तथा भाऊसाहेब खिलारे हे संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून नेमलेले होते. परंतु कै. विलासरावजी देशमुख यांच्या दुःखद निधनानंतर दि. १५ ऑगस्ट २०१२ पासून ते पुणे विद्यार्थी गृहाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष झाले. संस्थेच्या प्रगतीमध्ये व नवीन उभारणीमध्ये मा. भाऊसाहेब खिलारे यांचे सतत मोलाचे सहकार्य लाभले. ते संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना बोलावून संस्थेच्या चालू प्रगती विषयी व भावी योजनांविषयी मार्गदर्शन करीत असत.

महापालिकेच्या १९६८ च्या निवडणुकीमध्ये भाऊसाहेब खिलारे अपक्ष म्हणून निवडून आले. त्यानंतर १९८६ मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९९१ च्या महापौर पदाच्या निवडणुकीमध्ये भाऊसाहेब खिलारे पुण्याचे महापौर झाले. मात्र त्यानंतर त्यांनी निवडणूक लढविणार नाही असे जाहिर केले. भाऊसाहेब खिलारे यांनी स्थायी समितीचे अध्यक्षपद भूषविले होते. सध्या ते पुणे विद्यार्थी गृहाचे अध्यक्ष होते.

त्यांच्या निधनाने सामाजिक क्षेत्राची हानी झाली आहे. एक चांगला मार्गदर्शक हरपला आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखामध्ये संस्थेचे सर्व संचालक व सेवक सहभागी आहेत.

**ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो !** ***

# डॉ. खैरकुल गीता-निधी स्मृति व्याख्यानमाला एकतीसावे पुष्प

दि. १ सप्टेंबर २०१७ रोजी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात व्याख्यान आयोजित केले होते. परमपूज्य स्वामी श्री. गोविंददेव गिरीजी महाराज (आचार्य किशोरजी व्यास) यांचे 'खरं तर योग दिवस म्हणजेच गीता दिवस' या विषयावर प्रकट व्याख्यान संपन्न झाले.

स्वामीजींच्या हस्ते कै. गुरूवर्य डॉ. ग. श्री. खैर तथा अण्णासाहेब यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. सौ. अश्विनी महाजनी यांचे मार्गदर्शनाखाली मुक्तांगण इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सुश्राव्य श्रीशारदागीत गायले.

प्राचार्य हणमंत भोसले यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रास्ताविकात त्यांनी व्याख्यान परंपरा व कै. अण्णांची माहिती सांगितली. कै. अण्णांची पूर्वस्थिती, कष्टातून त्यांनी घेतलेले उच्च शिक्षण, अमेरिकेत एम.ए. व पीएच.डी. या प्राप्त केलेल्या पदव्या, परदेशातील शिक्षण पद्धतीचे अवलोकन करुन त्यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र विद्यालयात व पूर्ण महाराष्ट्रभर त्याचा प्रत्यक्ष वापर केला. शिक्षक क्षेत्रात विविध यशस्वी प्रयोग केले. व्यवसाय शिक्षणाचा प्रयोग आपल्या शाळेत केला. त्यावेळी शाळेत २७ विषय शिकविले जात होते. त्यांनी शिक्षक संघांच्या स्थापना केल्या. गीतेवर विपुल लेखन व प्रसारासाठी सतत दौरे, व्याख्याने इत्यादी विषयांला स्पर्श केला. कै. दादासाो केतकर व कै. अण्णासाो खैर या दोघांनी कठीण परिस्थितीत सुद्धा संस्था वाढवत नेली. आश्रमात व शाळेत विविध प्रयोग करुन संस्कारक्षम व देशप्रेमी विद्यार्थी घडविण्याचे मोलाचे कार्य केले, याचा आवर्जून उल्लेख केला.

कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांचे हस्ते व्याख्याते आचार्य किशोरजी व्यास यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि डॉ. अण्णांनी लिहिलेली सदाचार चिंतनी भाग १ ते ५ ही पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेच्या विज्ञान महाविद्यालय, पुणे येथील प्रा. सौ. स्वाती जोशी यांनी पीएच.डी. प्राप्त केल्याबद्दल प्रमुख व्याखात्यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संचालक डॉ. निहार वाळिंबे यांनी स्वामींचा परिचय करुन दिला. प्रचंड वाचन, पाठांतर, ओघवती वाणी, अनेक ठिकाणी प्रवचने, भागवतावर प्रवचने, स्वामींनी बालसंस्काराची केंद्र स्थापना केलेली आहेत. त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांनी ११ राज्यात ३० वेदविद्यालये सुरु केली. विशेषतः स्वामींची वैज्ञानिक दृष्टी इत्यादी गोष्टी विस्ताराने विशद केल्या.

व्याख्यानाच्या आरंभी श्रीरामाचा जप व श्रीकृष्ण प्रार्थना झाली. पवित्र वास्तू व वातावरणामुळे आनंद झाला. गीता कार्यामुळे व कै. अण्णांचे योगदानाबद्दल महाराष्ट्र कृतज्ञ राहील असे त्यांनी गौरवपर उद्गार काढले. गीता अभ्यासकांचे सोने झाले असून गीतेचा प्रभाव देश परदेशातील चिंतकांवर झालेला आहे. विज्ञानवादी खरे संत साहित्यिक म्हणून त्यांनी गुलाब महाराजांचा उल्लेख

कृपया उर्वरित वृत्त पृष्ठ क्र. ४७ वर पहावे

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : डॉ. टी. आर. गोराणे**

## नागपंचमीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी सर्प समज - गैरसमज प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन

साप हा निसर्गातला एक भित्रा परंतु माणसाला घाबरविणारा प्राणी आहे. सापाला मित्र समजण्याऐवजी भींतीपोटी माणूस त्याला आपला शत्रू समजतो. निसर्गसाखळीचा साप खरंतर एक अतिशय महत्त्वाचा दुवा आहे. मात्र सापांविषयी मानवी समाजामध्ये अनेक चुकीचे समज आहेत. त्याबाबतचे शास्त्रीय ज्ञान सर्व विद्यार्थ्यांना व्हावे, यासाठी सापांच्या जगात, भारतात तसेच महाराष्ट्रामध्ये आढळणाऱ्या विविध जाती त्यांचे वास्तव्य, भक्ष्य, प्रजनन, विषारी, निम्नविषारी, बिनविषारी प्रकार, सर्पदंश झाल्यावर करावयाचे प्रथोमपचार, अंधश्रद्धा अशी विपुल शास्त्रीय माहिती असलेल्या ६६ स्लाईड्स विद्यार्थ्यांना दाखविण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी माहिती लिहून घेतली. त्याद्वारे त्यांना कुटुंबामध्ये, मित्रांमध्ये प्रबोधन करण्यास सांगण्यात आले. दूध हे सापाचे अन्न नाही. साप बाळगू नये, साप आढळल्यास तत्काळ वनखात्याला कळवावे, सर्पतज्ज्ञांना बोलवावे, मात्र सापाला मारु नये, इजा करु नये असेही शिक्षकांनी सर्वांना सांगितले. प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांनी या स्लाईड्स उपलब्ध करुन दिल्या होत्या.

## पालक - शिक्षक संघाची सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

दि. ५.८.२०१७ रोजी विद्यालयामध्ये सदर सभेचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत विद्यालयाच्या कामकाजाचा आढावा, विद्यार्थी शिस्त, आरोग्य, गुणवत्ता, गैरहजेरी, फी संकलन, स्पर्धा परीक्षा, शाळाबाह्य विद्यार्थी शोध, विविध लाभाच्या योजनांसाठी कागदपत्रांची पूर्तता, विविध सांस्कृतिक उपक्रम अशा अनेक विषयांची चर्चा सभेत झाली. सभेत पालकांनी आपली मते, सूचना मांडल्या. त्यांच्या शंकांचे निराकरण प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांनी सभेत केले.

त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ साठी पालक शिक्षक संघाची कार्यकारिणी निवडण्यात आली. मागील वर्षाच्या कार्यकारिणीबाबत कृतज्ञता, आभार व्यक्त करुन, नवनिर्वाचित कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी ११ वाजता कार्यकारिणी सभा विद्यालयामध्ये घेण्याचे ठरले. या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला महाराष्ट्र विद्यालय माजी विद्यार्थी संघाच्यावतीने विद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याला सहा वह्या देण्यात आल्याचे प्राचार्यांनी सभेत सांगितल्यावर सर्वांनी उत्स्फूर्तपणे टाळ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

तत्पूर्वी प्रत्येक वर्गातून वर्गशिक्षकांच्या अध्यक्षते खाली त्या त्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालक शिक्षक यांच्या एकत्रित सर्वसाधारण सभा झाली. १३० पालक आणि सर्व शिक्षक सभेला उपस्थित होते. प्रास्ताविक पर्यवेक्षक श्री. भागवत शेलार यांनी केले. शिक्षक श्री. नारायण रणदिवे यांनी आभार मानले. चहापानानंतर सभा संपल्याचे अध्यक्षांनी जाहिर केले.

## स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

स्वतंत्र भारताचा ७१ वा स्वातंत्र्यदिन विद्यालयामध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी मा. डॉ. वसंतराव वाघ, माजी प्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले होते. राष्ट्रगीत तसेच एन.सी.सी. परेड मार्फत ध्वजवंदना देण्यात आली. यावेळी ध्वजप्रतिज्ञेचे व स्वच्छता प्रतिज्ञेचे सामुदायिक वाचन अनुक्रमे पर्यवेक्षक श्री. भागवत शेलार व शिक्षक श्री. नारायण रणदिवे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. टी. आर. गोराणे यांनी करुन दिला. कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांच्या हस्ते डॉ. वसंतराव वाघ यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकामध्ये प्राचार्य

डॉ. टी. आर. गोराणे यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या तमाम स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन करुन देशाप्रती आपली जबाबदारी स्वीकारण्यासाठी आपण स्वातंत्र्यदिन साजरा करतो असे प्रतिपादन केले. प्रमुख पाहुणे डॉ. वसंतराव वाघ यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये विद्यार्थी व शिक्षक यांनी कठोर परिश्रम घ्यावेत. सहिष्णुता बाळगावी असे सांगितले. यावेळी क्रांतिदिनाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी स्वतंत्र भारतातील अद्याप साध्य न झालेल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व इतर ठळक बाबी साध्य करण्यासाठी काय उपाययोजना करावी अशा आशयाचे २०० ते ३०० शब्दांमध्ये निबंध लिहून दिले. त्या सर्व निबंधांचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच संस्थेचे देणगीदार श्री कमलेश्वर न्यास यांच्यामार्फत विद्यालयामधील गरीब, गरजू, होतकरु व हुशार विद्यार्थ्यांना आर्थिक स्वरुपात शिष्यवृत्ती मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. याप्रसंगी मुक्तांगण इंग्लिश स्कुल, सदाशिव पेठ शाखेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्तीपर गीतावर नृत्याविष्कार सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. वातावरणामध्ये चैतन्य निर्माण केले.

या राष्ट्रीय कार्यक्रमासाठी कार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे, कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर, ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, संचालक श्री. रमेश कुलकर्णी, श्री. कृष्णाजी कुलकर्णी, महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्थेचे प्राचार्य श्री. परमेश्वर व्ही. शिंदे, सर्व विभागातील शिक्षक, शिक्षकेतर सेवक, पालक, माजी विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका सौ. अंजली धारुरकर यांनी केले. सूत्रसंचालन सौ. किर्ती राठोड यांनी केले. कार्यक्रम संपल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. ✻✻✻

# आश्रम वसतिगृह, पुणे

**संचालक : श्री. रमेश कुलकर्णी**

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये जुने ८३ व नवीन ४३ मिळून एकूण १२६ विद्यार्थ्यांना आश्रमात प्रवेश देण्यात आला. हे सर्व विद्यार्थी आश्रम वसतिगृहात राहून शालेय शिक्षण घेत आहेत. सन २०१७-१८ मध्ये वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची इयत्तावार, जिल्हावार व जातवार संख्या पुढीलप्रमाणे -

**इयत्तावार विद्यार्थ्यांची संख्या**

| | | | |
|---|---|---|---|
| इयत्ता ५वी | ०३ | इयत्ता ८वी | ३२ |
| इयत्ता ६वी | ०५ | इयत्ता ९वी | १७ |
| इयत्ता ७वी | १९ | इयत्ता १०वी | ५० |

**जिल्हावार विद्यार्थ्यांची संख्या**

| जिल्हा | विद्यार्थी संख्या | जिल्हा | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| पुणे | ४० | औरंगाबाद | ०३ |
| उस्मानाबाद | ३६ | जालना | ०३ |
| बीड | २० | जळगांव | ०२ |
| अहमदनगर | ११ | रत्नागिरी | ०१ |
| सोलापूर | ०५ | सांगली | ०१ |
| सातारा | ०३ | लातूर | ०१ |

**जातवार विद्यार्थ्यांची संख्या**

| जात | विद्यार्थी संख्या | जात | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| मराठा | ७९ | न्हावी | ०२ |
| धनगर | १४ | माळी | ०२ |
| वाणी | ०५ | मातंग | ०१ |
| वंजारी | ०४ | भोई | ०१ |
| महार | ०४ | लोहार | ०१ |
| चांभार | ०३ | ठाकर | ०१ |
| सुतार | ०३ | वडार | ०१ |
| ब्राह्मण | ०४ | कोल्हाटी | ०१ |

सन २०१६-१७ मध्ये आश्रम वसतिगृहात राहून शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा वार्षिक निकाल १००% लागला असून इयत्ता ६वी ते १०वी मध्ये प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे -

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | शेकडा | श्रेणी |
|---|---|---|---|
| कु. वामन अशोक जा. | ६वी | ८०% | प्रथम |
| कु. शेकडे भागवत द. | ६वी | ७७.५०% | द्वितीय |
| कु. जाधव ओंकार रा. | ६वी | ७७.३% | तृतीय |
| कु. मिसाळ प्रथमेश सं. | ७वी | ९१.३% | प्रथम |
| कु. पवार अमर हौ. | ७वी | ८९.७% | द्वितीय |
| कु. काळे यश सुनिल | ७वी | ८८.३% | तृतीय |
| कु. जगताप प्रतिक कै. | ८वी | ८६.६% | प्रथम |
| कु. काळे आकाश रा. | ८वी | ८४% | द्वितीय |
| कु. इगावे मयुर दौ. | ८वी | ८३.५% | तृतीय |
| कु. मिसाळ अतिष वि. | ९वी | ८३.४% | प्रथम |
| कु. पुणेकर अवधुत रो. | ९वी | ८२.१% | द्वितीय |
| कु. वाळके रोहन रा. | ९वी | ७९.४% | तृतीय |
| कु. गाडे हर्षद सु. | १०वी | ८६.८०% | प्रथम |
| कु. काळे शुभम भा. | १०वी | ८५.४०% | द्वितीय |
| कु. शिंदे ऋषिकेश रा. | १०वी | ७९.८०% | तृतीय |

**वरील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!** ✻✻✻

# विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : डॉ. शं. पां. किंजवडेकर**
**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**
**कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**

**प्राथमिक इंग्रजी**
**मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळिक**

### कालिदास दिन

दि. २४ जून २०१७ रोजी विद्याभवन सभागृहात कालिदास दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ व सौ. मनिषा मुळिक यांच्या हस्ते महाकवी कालिदास यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर सौ. ममता राक्षे यांनी कालिदास यांच्या अनेक काव्य कथा संग्रहाविषयी माहिती दिली. कवी कालिदास हे संस्कृत भाषेतील एक महान नाटककार व कवी होते. त्यांची रघुवंश आणि कुमारसंभव ही दोन काव्ये उपलब्ध आहेत. त्यांच्या 'अभिज्ञान शाकुन्तलम्' या नाटकाचे अनेक भाषामध्ये रूपांतर करण्यात आले आहे. सौ. वर्षा निकम यांनी कवी कालिदास यांच्या मेघदूत या काव्याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनीही कवी कालिदास यांच्याविषयी विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुरबिला गोपालकृष्ण यांनी केले व प्रिया तिय्यर यांनी आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला.

### मोफत शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम

दि. २४ जून २०१७ रोजी श्री. ल. दि. कुलकर्णी (माजी विद्यार्थी, पुणे विद्यार्थी गृह) यांच्या मार्फत प्राथमिक इंग्रजी विभागाच्या १२ विद्यार्थ्यांना व माध्यमिक इंग्रजीच्या १३ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या व शाळेच्या वतीने त्यांचे हार्दिक आभार. या कार्यक्रमप्रसंगी प्रमुख अतिथी श्री. श्रीकांत कुलकर्णी, संचालक श्री. शं. पां. किंजवडेकर श्री. दिनेश मिसाळ दोन्ही विभागाच्या मुख्याध्यापिका, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

**माध्यमिक इंग्रजी**
**मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ**

### वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रम

दि. १ जुलै २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाच्या वृक्ष लागवडीच्या उपक्रमात दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे भाग घेऊन वृक्ष लागवड केली. दि. १ जुलै रोजी वृक्षदिंडी काढली. विद्यार्थ्यांनी पर्यावरण व वृक्ष या विषयावर पोस्टर्स तयार करुन वृक्षदिंडीमध्ये दर्शविण्यात आले. झाडे लावा, झाडे जगवा, वृक्ष तोड थांबवा. अशा विविध घोषणा देऊन सामजिक जनजागृती करण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती साधना कुलश्रेष्ठ व शिक्षक वर्ग देखील वृक्षदिंडी व वृक्ष लागवडीमध्ये सहभागी होते.

### शिष्यवृत्ती परीक्षा निकाल

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये महाराष्ट्र राज्य

परीक्षा मंडळ, पुणे यांच्या मार्फत फेब्रुवारी २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इ. ५वी चे २३ विद्यार्थी व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इ. ८वीचे १८ विद्यार्थी बसले होते. खालील विद्यार्थी शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीमध्ये झळकले.

**इयत्ता ५ वी**

| विद्यार्थ्यांची नाव | मिळालेले गुण ३०० पैकी | गुणवत्ता यादी क्रमांक (ठाणे जिल्हा) |
|---|---|---|
| कु. प्रिया राऊत | २०२ | २९८ |
| कु. मानसी मेस्त्री | १९६ | ३७९ |

**इयत्ता ८ वी**

| | | |
|---|---|---|
| कु. अपेक्षा औटी | २३० | ७४ |
| कु. अभिमन्यू वाफारे | २१४ | १६० |
| कु. वैष्णवी गुरव | २०० | २५२ |
| कु. हरिओम त्रिपाठी | १९२ | ३४८ |

**अभिनंदन वार्ता**

दि. २५ जून २०१७ रोजी आर्य समाज पंजाबी सभा यांच्या संयुक्त कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख अतिथी श्री. जोस कुरियन आणि अध्यक्ष श्री. हरजिंदर सिंह सैनी यांचे मार्फत नेरुळ मधील माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या कु. आदेश सहदेव चौधर आणि कु. तेजस्विनी मनोहर मांदाडकर या विद्यार्थ्यांचा स्मृतिचषक देऊन गौरव करण्यात आला.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या व संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !**

**उच्च माध्यमिक विभाग**
**मुख्याध्यापिका सौ. विजया गणेश**

**वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रम**

दि. १ जुलै २०१७ रोजी विद्याभवन, नेरुळ येथे उच्च माध्यमिक विभागातर्फे वृक्षादिंडी व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मुख्याध्यापिका श्रीमती विजया गणेश यांनी वृक्षादिंडीचे नेतृत्व केले. महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाने केलेल्या अवाहनानुसार वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेतला गेला. वृक्षदिंडी नंतर पाम बीच रोड परिसरामध्ये वृक्ष लागवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण केले. संपूर्ण कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा उत्साह व आनंद ओसंडून वाहत होता. सर्वांनी वृक्षारोपणानंतर वृक्षसवंर्धन व वृक्षसंगोपनाची शपथ घेतली.

**प्राथमिक मराठी**
**मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**गुरुपौर्णिमा**

दि. ८ जुलै २०१७ रोजी गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी केली. या कार्यक्रमासाठी संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ व सौ. विजया गणेश तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संचालक श्री. दिनेश मिसाळ यांच्या शुभहस्ते गुरु व्यास मुनींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून गुरुची महती सांगितली. मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, प्रत्येक विद्यार्थ्यांने आपले आई-वडील व गुरुंचा आदर करावा. चांगल्या सवयींचे पालन करावे. चांगले संस्कार अंगिकारावे, चांगले शिकून स्वत:चे त्याबरोबर शाळेचे नाव मोठे करावे, असे विचार व्यक्त केले. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधुन शालेय स्तरावर विद्यार्थ्यांचे मंत्री मंडळ निवडले गेले.

**पूर्व - प्राथमिक मराठी**
**मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**ब्लू डे**

पूर्व प्राथमिक मराठी विभाग दि. २८.६.२०१७ रोजी ब्लू डे साजरा करण्यात आला. यादिवशी निळ्या रंगासंबंधीत असणाऱ्या अनेक प्रकारच्या वस्तू दाखविल्या तसेच निळ्या रंगाविषयी माहिती सांगण्यात आली. सर्व मुलांनी निळ्या रंगाचे कपडे घातले होते.

**दिंडी**

दि. ४.६.२०१७ रोजी आषाढी एकादशी निमित्त

दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. 'विठू माझा लेकुरवाळा संगे संतांचा मेळा' अशा या सावळ्या मनोहर विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक भक्त पंढरपुरात गर्दी करतात. लहान बाळ गोपाळांच्या सहाय्याने पंढरपूरचे भावचित्र दर्शविण्याचा प्रयत्न केला होता. दिंडीच्या दिवशी सर्व मुले वारकरी कपडे घालून आले. त्यातील काही मुलांना ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, गोरा कुंभार, जनाबाई, मीराबाई इ. संत मंडळी बनवले होते. या कार्यक्रमास संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ, सौ. विजय गणेश, सौ. मनिषा मुळिक व सौ. साधना कुलश्रेष्ठ उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पालखीचे पूजन करून आरत्या म्हणून विठ्ठल रुक्मिणी मंदीर दर्शन करुन दिंडी सोहळा साजरा केला.

**तिसरा मजला बांधकाम प्रारंभ**

नेरुळ शाखेच्या शालेय इमारतीच्या तिसऱ्या मजल्याच्या बांधकामासाठीच्या सर्व परवानग्या मिळाल्या आहेत. दि. १.६.२०१७ रोजी बांधकामाचा शुभारंभ ज्येष्ठ संचालक प्राचार्य कृ. ना. शिरकांडे, कार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे, संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर व श्री. दिनेश मिसाळ, सर्व मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व बांधकाम व्यावसायिक श्री. मनिष पटेल, श्री. केशुभाई पटेल, श्री. मणिलाल पटेल व इतर सर्व सहकारी यांच्या उपस्थितीत विधीवत पूजा करुन श्रीफळ वाढविण्यात आले. ***

# मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा

**संचालक : प्रा. आर. एस. कांबळे**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. अंजली धारुरकर**

दि. १५ जून २०१७ रोजी उत्स्फूर्त व आनंददायी वातावरणामध्ये नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी सर्व शिक्षिकांनी वर्गखोल्यांची सजावट करुन खाऊ देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभाग मिळून १००० एवढी झालेली आहे.

दि. ८.७.२०१७ रोजी विलोभनीय पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. ढोल ताश्यांचे पथक, झेंडा पथक, वारकरी भजनी मंडळ, 'वृक्ष लावा वृक्ष जगवा' दिंडी तसेच पर्यावरण पूरक फलक घेऊन व घोषणा देऊन विद्यार्थ्यांनी या पालखी सोहळ्यात भाग घेतला.

प्र. मुख्याध्यापिका सौ. अंजली धारुरकर व शिशुनिकेतन मराठी माध्यमाच्या प्र. मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनी पालखी पूजन करुन पालखीस प्रारंभ झाला. कार्यक्रमाची सांगता विठ्ठल रुखमाईच्या मंदिरामध्ये झाली.

सिंहगड परिसर आयोजित पालखी स्पर्धेत ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. उत्तम कलाकार म्हणून दोन विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| कु. शार्दुल वाघुले | इ. ७ वी | मोठा गट |
| कु. समिक्षा योगेश घुले | इ. २ री | छोटा गट |

**तसेच शाळेला सहभागी झाल्याबद्दल चषक देऊन गौरविण्यात आले.**

पुणे शिक्षण मंडळ आयोजित कार्यशाळेत इ. ६ वी च्या शिक्षिका सौ. अमिता संदिप देशमुख व इ. ९ वी च्या शिक्षिका सौ. स्वरुपा सचिन मोरे यांनी प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणाचा उपयोग अध्ययन - अध्यापन प्रक्रिया सोपी करण्यासाठी करण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांमध्ये गणित व शास्त्र विषयाची आवड निर्माण करण्यासाठी करण्यात येईल.

***

## विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ, नवी मुंबई शाखा

**संचालक : डॉ. शं. पां. किंजवडेकर**
**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**
**कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**

### पूर्व - प्राथमिक इंग्रजी
### मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ

**दहिहंडी**

दि.१४.८.२०१७ रोजी दहिहंडी चे आयोजन करण्यात आले होते. मुले राधा, कृष्ण, गोपिका यांच्या वेशभूषेत सजून आले होते. ''गोविंदा आला रे आला'' म्हणत सगळी चिमुकली मुले गाण्याच्या तालावर नाचत होती. शिक्षिकांच्या मदतीने मुलांनी एकावर एक असे थर लावून दहिहंडी फोडली. प्राथमिक विभागाची मुलेही यात सहभागी झाली होती. अशा प्रकारे हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ उपस्थित होत्या. तसेच प्राथमिक विभागाच्या शिक्षिका पूर्व - प्राथमिक विभागाच्या सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**आंतरशालेय गीता पाठांतर स्पर्धा**

दि. १२ ऑगस्ट २०१७ रोजी विद्याभवन शाळा नेरुळ येथे पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग आयोजित आंतरशालेय गीता पाठांतर स्पर्धेचे आयोजन केले जाते. स्पर्धेमध्ये विद्याभवन प्राथमिक इंग्रजी विभागाच्या खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

**स्पर्धा - मराठी (सर्व बोधपद्य गीता) गट क्र. २**

| विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. अनघा अतोल भातमारे | इ. २री / ब | प्रथम |
| कु. गौरी अशोक आहेर | इ. २री / ब | द्वितीय |
| कु. आर्या सागर नाक्ती | इ. २री / अ | तृतीय |

**मराठी (सर्व बोधपद्य गीता) गट क्र. ३**

| | | |
|---|---|---|
| कु. संतुष्ट अंकुश घेरडे | इ. ३री / अ | तृतीय |

**संस्कृत (भगवत गीता) गट क्र. २**

| | | |
|---|---|---|
| कु. सुहानी प्रसन्नकुमार कांबळे | इ. २री / ब | द्वितीय |
| कु. लेखा वैभव पाटील | इ. २री / अ | तृतीय |

**संस्कृत (भगवत गीता) गट क्र. ३**

| | | |
|---|---|---|
| कु. मधुरा गणेश गुलभिले | इ. ३री /अ | प्रथम |

**आषाढी एकादशी**

''आम्हा विठ्ठल एकचि देव........ सावळे सुंदर रूप मनोहर........ म्हणत विठुरायाचे रूप डोळ्यात सामावून घेत, माऊली माऊली ज्ञानेश्वर माऊली विठ्ठल रुप तुझे........'' अशी विठूनामाच्या गजरात विद्याभवन शाळेच्या सभागृहात दिंडी सोहळ्याचे दि. ४.८.२०१७ रोजी आयोजन करण्यात आले. आषाढी एकादशी म्हणजे वैष्णवांचा एकमेकांना व पांडुरंगाला भेटण्याचा सोहळा. संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ, सौ. मनिषा मुळीक व सौ. सुवर्णा मिसाळ दिंडीत सहभागी झाले. सदर दिंडी पालखीचे पूजन श्री. दिनेश मिसाळ यांचे हस्ते झाले. त्यांनी श्रीफळ वाढवून दिंडीची पूजा केली. नंतर आरती करुन ढोल ताशाच्या गजरात विठ्ठल नामाच्या गजरात पालखीची सुरुवात होऊन ती मार्गस्थ झाली. शाळेच्या समोरील विठ्ठल रखुमाईच्या मंदिरात दिंडी दर्शनासाठी नेण्यात आली. मंदिराच्या संचालक मंडळाने श्री. दिनेश मिसाळ यांचा श्रीफळ देऊन सत्कार केला. श्री. दिनेश मिसाळ यांनी मंदिराच्या संचालक मंडळाचे आभार व्यक्त केले. तसेच जगाचा पोशिंदा शेतकरी राजा बद्दल पांडुरंगाकडे साकडे घातले. ग्रामीण भागात पावसाचा वर्षाव होवो, ही सदिच्छा व्यक्त केली. सर्व चिमुकल्या भक्तांना प्रसाद दिला. नंतर तेथून दिंडी मार्गस्थ होऊन शाळेत पोहचली. या दिंडीचे सर्व विद्यार्थी त्यांचे पालक, शिक्षकवृंद यांनी दर्शन घेतले. सर्व विभागाच्या मुख्याध्यापिका, शिक्षक आणि विद्यार्थी यांनी रिंगण सोहळा आखला, झिम्मा-फुगडी घालून पालखीचा आनंद द्विगुणित केला. या प्रसंगी प्रसाद वाटण्यात

आला. या भाविकवारीत एकूण २५० विद्यार्थी, शिक्षक पालकांनी सहभाग घेतला. आषाढी एकादशीचा सोहळा भावपूर्ण आनंदात साजरा करण्यात आला.

### नागपंचमी

दि. २७ जुलै रोजी पूर्व-प्राथमिक इंग्रजी विभागातर्फे नागपंचमी हा सण साजरा करण्यात आला. सुशोभित अशा पाटावर नागोबाची मूर्ती ठेवण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ यांच्या हस्ते नागोबाचे पूजन करण्यात आले. दूध व लाह्यांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. त्यानंतर आरती करण्यात आली. सौ. साधना कुलश्रेष्ठ यांनी मुलांना नागपंचमीच्या शुभेच्छा दिल्या. मुलांना नागपंचमीची माहिती सांगण्यात आली. अशाप्रकारे आनंदाने हा सण साजरा करण्यात आला.

### दीपपूजन व ग्रीन डे

दि. २५ जुलै २०१७ रोजी पूर्व -प्राथमिक इंग्रजी विभागातर्फे दीप पूजन तसेच ग्रीन डे साजरा करण्यात आला. दीप पूजनासाठी मुलांनी सुंदर सुशोभित केलेले दिवे आणले होते. सुंदर अशी रांगोळी काढून त्यावर दिव्यांची आरास करण्यात आली होती. सर्व दिवे फुलांनी सुशोभित करण्यात आले होते. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करण्यात आले. त्यानंतर 'दिव्या दिव्या दीपत्कार' ही प्रार्थना म्हणण्यात आली. मुलांना दीपपूजनाची माहिती सांगण्यात आली. याच दिवशी ग्रीन डे उत्साहात साजरा करण्यात आला.

### रेन डे

दि. ३ ऑगस्ट २०१७ रोजी पूर्व - प्राथमिक इंग्रजी विभागातर्फे रेन डे आयोजित करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षिकांनी पावसाचा आनंद लुटला. या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ उपस्थित होत्या. 'रेन रेन गो अवे' 'बारिश आई बारिश आई' अशी काही नर्सरी राइम्स म्हणत मुलांनी खूप मजा केली, तसेच गाण्याच्या तालावर विद्यार्थ्यांनी नृत्य करुन हा दिवस खूप उत्साहात व आनंदात साजरा केला.

### यलो डे व रक्षाबंधन

दि. ४ ऑगस्ट २०१७ रोजी पूर्व - प्राथमिक इंग्रजी विभागातर्फे यलो डे तसेच रक्षाबंधन साजरे करण्यात आले. यलो डे साठी सर्व मुले व शिक्षिका यलो रंगाचे कपडे परिधान करून आले होते. शिक्षिकांनी मुलांना यलो रंगाच्या वस्तू दाखवून रंगाची ओळख करुन दिली. याच दिवशी रक्षाबंधन सुध्दा साजरे करण्यात आले. पूर्व प्राथमिक विभागाच्या मुलींनी मुलांना विविध प्रकारच्या राख्या बांधल्या. मुलांनी भेटवस्तु म्हणून मुलींना चॉकलेटस दिले. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर व श्री. दिनेश मिसाळ यांनाही मुलींनी राख्या बांधल्या. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. याप्रसंगी यांनी मुलांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. अशाप्रकारे यलो डे व रक्षाबंधन आनंदात साजरा करण्यात आला.

## प्राथमिक मराठी
## मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ

### निसर्गपूजा

दि. १० ऑगस्ट २०१७ रोजी निसर्गपूजेचा कार्यक्रम उत्साहात साजरा केला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून सौ. वंदना गोखले, श्री. अरुण गोखले व सौ. प्रतिभा महाजन हे उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ सौ. विजया गणेश सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्राथमिक मराठी विभागाच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले त्यानंतर प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते दीपपूजन करण्यात आले. मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करुन दिला. सहशिक्षिका सौ. मेघाराणी जोशी यांनी निसर्गपूजा सांगितली. निसर्गपूजेच्या शेवटी सर्व शिक्षकांनी निसर्ग आरती म्हटली. त्यानंतर इ. १ली व २रीच्या विद्यार्थिनींनी छान अशी मंगळागौर सादर केली. त्यांना उपस्थितांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख अतिथी सौ. वंदना गोखले

यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या की, निसर्ग हा आपला सोबती आहे. प्रत्येकाने निसर्गाची काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी सर्वांनी कमीतकमी एक तरी झाड लावून त्याचे संवर्धन केले पाहिजे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. कविता तेंडुलकर व आभारप्रदर्शन श्री. शशिकांत पुजारी यांनी केले.

**अभिनंदनीय**

**मास्टर डोजो कराटे सिलेक्शन टूर्नामेंट**

दि. ३० जुलै २०१७ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाची विद्यार्थिनी कु. तन्वी विकास थोरात इ. ७वी हिने विद्याभवन शाळेत घेण्यात आलेल्या मास्टर डोजो कराटे सिलेक्शन टूर्नामेंट या स्पर्धेत सहभाग घेवून काता प्रकारात गोल्ड मेडल व कुमिथे प्रकारात ब्राँझ मेडल मिळविले. **शाळेच्या व संस्थेच्या वतीने तिचे हार्दिक अभिनंदन !**

**माध्यमिक इंग्रजी**
**सौ. साधना कुलश्रेष्ठ**

**इ. ७वी पुनर्रचित अभ्यासक्रम प्रशिक्षण**

दि. २४ जुलै २०१७ रोजी नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत इ. ७वी पुनर्रचित अभ्यासक्रम प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षणाच्या वेळी विस्तार अधिकारी श्रीमती रेखा पाटील तसेच विषय शिक्षक तज्ञ उपस्थित होते. इंग्रजी माध्यमिक विभागाचे सहा. शिक्षक व शिक्षिका यांनी खालील प्रमाणे विषयवार प्रशिक्षण घेतले.

| दिनांक | विषय | सहा. शिक्षक/शिक्षिका |
|---|---|---|
| २४.०७.२०१७ | मराठी | श्री. जगन्नाथ कोळी |
| २५.०७.२०१७ | गणित | श्री. दीपा रवीकुमार |
| २६.०७.२०१७ | हिंदी | मनिषा मुळे |
| २७.०७.२०१७ | विज्ञान | शीतल बेंबडे |
| २८.०७.२०१७ | इतिहास | सायरा टोले |
| २९.०७.२०१७ | इंग्रजी | हेमा निंगूदळ्ळी |
| ०१.०८.२०१७ | भूगोल | अनुपमा कोटियन |

**इ. ९वी पुनर्रचित अभ्यासक्रम प्रशिक्षण**

दि. २.७.२०१७ रोजी नाशिक येथे इ. ९ वी पुनर्रचित अभ्यासक्रम प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. माध्यमिकच्या सहा. शिक्षिका सौ. रत्ना सिंग इतिहास या विषयाच्या राज्यस्तरिय माध्यमिक शिक्षण अभ्यासक्रम इ. ९वी पुनर्रचित अभ्यासक्रम प्रशिक्षिणासाठी उपस्थित होत्या. या प्रशिक्षणांतर्गत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना इतिहास विषय कसा शिकवावा? विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कसे करावे? उपयोजन कसे करावे? एकूण तासिका किती/ याची माहिती देण्यात आली.

**नेत्र तपासणी शिबिर**

दि. २०.७.२०१७ रोजी आयवेव्ह स्पेशालिटी आय क्लिनिक यांच्या मार्फत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये माध्यमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. डॉ. पल्लवी अग्रवाल व त्यांचे सहकारी प्राची गाढवे व श्री. सुनिल केशरे यांनी एकूण ५५६ विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी केली.

**तंबाखू विरोधी कार्यशाळा**

दि. २७ जून २०१७ रोजी माध्यमिक इंग्रजी विभागातील इ. ९वी व इ. १०वी तील विद्यार्थ्यांसाठी शार्प एन. जी. ओ. यांचे मार्फत श्रीमती तन्वी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली तंबाखू विरोधी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना लघूचित्रफित दाखवून तंबाखूपासून होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांकडून तंबाखूपासून दूर राहण्याची शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांकडून एक छोटेसे नाटक सादर करण्यात आले.

**इयत्ता ९वी साठी जलदगतीने शिक्षण प्रशिक्षण**

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र माध्यमिक स्तर इ. ९वी च्या मुलांचे जलदगतीने शिक्षण कार्यक्रमाअंतर्गत इ. ९वी ला गणित, इंग्रजी व विज्ञान विषय शिकवणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे सरस्वती विद्यालय पाचपाखडी, ठाणे येथे आयोजित

करण्यात आले होते. त्या प्रशिक्षणाअंतर्गत इ. ९वी तील अप्रगत विद्यार्थ्यांना अध्यापन कसे करावे? याचे मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणाचा कालावधी १ जुलै ते २ जुलै २०१७ दोन दिवस होता. इंग्रजी माध्यमिक विभागाच्या सहा. शिक्षिका यांनी खालील विषयावर प्रशिक्षण घेतले.

| दिनांक | विषय | सहा. शिक्षिका |
|---|---|---|
| १जुलै | इंग्रजी व गणित | सौ. रत्ना सिंग, सौ. सायरा टोले, सौ. दीपा रवीकुमार |
| २ जुलै | विज्ञान | सौ. श्रीजा नायर |

## प्राथमिक इंग्रजी
## मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळिक

### वृक्षारोपण दिवस

दि. ७ जुलै २०१७ रोजी विद्याभवन शाळेत प्राथमिक इंग्रजी विभागाने वृक्षारोपण दिवस साजरा केला. या दिवशी प्राथमिक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका सहशिक्षिका व विद्यार्थी यांनी मिळून शाळेच्या आवारात वेगवेगळ्या वृक्षांचे उत्साहाने रोपण केले.

### गुरुपौर्णिमा

दि. ८ जुलै २०१७ रोजी विद्याभवन सभागृहात गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ व सौ. मनिषा मुळिक यांच्या हस्ते महर्षी व्यास यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिक्षिका सौ. प्रतिभा कुमकर यांनी महर्षी व्यास यांच्याविषयी माहिती दिली. सौ. ममता राक्षे यांनी गुरुभजन सादर केले. सौ. मनिषा मुळिक यांनी आपला सर्वात प्रथम गुरु 'आई' असते हे सांगितले. श्रीमती अनुपमा कोटियन यांने गुरुपौर्णिमा हा दिवस भारतामध्ये आणि नेपाळमध्ये साजरा केला जातो असे सांगितले. माध्य. व प्राथ. इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनीही गुरुपौर्णिमेविषयी माहिती दिली व कविता सादर केल्या. मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळीक यांनी शिष्याने गुरुजवळ नम्र झाल्याविना त्याला ज्ञान प्राप्त होणार नाही, गुरु म्हणजे ज्ञानाचा सागर आहे, असे सांगून विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ यांनी आपल्याला कोणत्याही विषयासंबधीत ज्ञान ज्याच्यांकडून मिळते त्यास गुरु मानावे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अमृता मावई यांनी केले व सौ. सुरबिला गोपालकृष्ण यांनी आभार व्यक्त करुन कार्यक्रमाचा समारोप केला.

### डोळे तपासणी

दि. २४,२५,२६ जुलै २०१७ रोजी प्राथमिक इंग्रजी विभागाच्या इयत्ता १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांची आय वेव्ह क्लिनिक तर्फे आलेल्या डॉ. निलेश मसुरकर, डॉ. दीपक देशमुख, डॉ. सुनिल केसरी, डॉ. प्राची गावडे व डॉ. भावना गावडे यांनी ४७० विद्यार्थ्यांची मोफत डोळे तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांना डोळ्याच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. संस्थेच्या व शाळेच्या वतीने त्यांचे आभार.

### परिवहन सभा

दि. २५ जुलै २०१७ रोजी शालेय परिवहन समितीची पहिली सभा आयोजित करण्यात आली. या सभेसाठी श्री. नितीन वडाळ, (पोलिस, नाईक), संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. विजया गणेश, सौ. सुवर्णा मिसाळ व सौ. मनिषा मुळीक, बसमालक श्री. वसीम शेख, बसचालक श्री. संतोष सूर्यवंशी, शिक्षक व बसने येणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. त्यानंतर गाडीचे कागदपत्र, चालकाचा वाहक परवाना, गाडीची वेग मर्यादा, मुलांची सुरक्षितता या विषयांवर श्री. नितीन वडाळ यांनी सर्वांसोबत चर्चा केली.

### बालसभा

दि. ३१ जुलै २०१७ रोजी ब्लू हाऊसच्या विद्यार्थ्यांची बालसभा आयोजित करण्यात आली. ब्लू हाऊसच्या विद्यार्थ्यांनी विविध नृत्यांचे व नाटिकांचे सादरीकरण केले. ब्लू हाऊसच्या विद्यार्थिनी कु. भक्ती चव्हाण व कु. निर्जरा चिकने यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व शिक्षिका श्रीमती प्रिया तिय्यर यांनी

आभार व्यक्त करुन बालसभेचा समारोप केला.

## प्राथमिक मराठी
## मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ

### दीपपूजन

दि.२१ जुलै २०१७ रोजी प्राथमिक मराठी विभागाने शाळेच्या सभागृहामध्ये दीपपूजन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ यांच्या शुभहस्ते दीपपूजन करण्याता आले. दीपपूजन झाल्यानंतर सहशिक्षिका श्रीमती नूतन गवांदे यांनी विद्यार्थ्यांना दीप अमावस्येची महती सांगितली.

### नागपंचमी

दि. २७ जुलै २०१७ रोजी प्राथमिक मराठी विभागाने नागपंचमी हा मराठमोळा सण उत्साहात साजरा केला. मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ व सौ. विजया गणेश व सर्व शिक्षकवृंद यांनी नागदेवतेची पूजा केली. सहशिक्षिका सौ. कविता तेंडुलकर यांनी विद्यार्थ्यांना नागपंचमी या सणा विषयी माहिती सांगितली. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी नागपंचमीबद्दलच्या पौराणिक कथा सांगून या सणाचे हिंदू संस्कृतीमधील महत्व सांगितले.

### ७१वा स्वातंत्र्य दिन

दि.१५ ऑगस्ट २०१७ रोजी विद्याभवन शाळेमध्ये भारताचा ७१वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्री. लक्ष्मण गणेश पाध्ये हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर, व श्री. दिनेश मिसाळ, श्री. अशोक लोणकर (माजी विद्यार्थी) व शाळेतील सर्व विभागाच्या मुख्याध्यापिका, शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांच्या शुभहस्ते प्रमुख अतिथींचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करुन दिला. त्यानंतर प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते स्कॉलरशिप परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. तसेच शाळेतील वीस विद्यार्थ्यांना श्री कमलेश्वर न्यास शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. नंतर मार्गदर्शनपर भाषणात प्रमुख अतिथींने विद्यार्थ्यांना स्वच्छतेचा संदेश दिला. ते म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्याने समाजात वावरतानां स्वच्छतेला प्राधान्य दिले पाहिजे. त्यासाठी स्वच्छतेची सुरुवात आपल्या सवयीतून व घरातून व्हायला हवी, त्यानंतर संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनीही आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करताना देशभक्तीपर गीतांचे गायन, योगासने, मनोरे, देशभक्तीपर भाषणे असे विविध कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम्ने करण्यात आली.

***


**सबंध पुस्तकात पक्षिवर्गाविषयी प्रथम सर्वसामान्य माहिती देऊन नंतर लेखकाने प्रत्यक्ष पाहिलेल्या, निरीक्षिलेल्या अशा सुमारे सत्तर पक्ष्यांची माहिती या पुस्तकात पक्ष्यांच्या रंगीत फोटोंसह दिलेली आहे**

**पक्षिविज्ञान**

(Birds' Life)

**डॉ. वि. ना. गोखले**

**पीएच्. डी., डी. आय. सी. (लंडन)**

**मूल्य १५०/- रुपये**

**पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन**

१७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

# विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर, मुंबई शाखा

**कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**संचालक : श्री. दिनेश पि. मिसाळ**

**विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय**
**मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार**

### पालक सभा

दि. २४ जून २०१७ ते ५ जुलै २०१७ या कालावधीत प्रशालेच्या सभागृहात इ.५वी ते १० वीच्या सर्व वर्गांच्या पालकसभा घेण्यात आल्या.

या पालक सभांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१६ - २०१७ मधील एस.एस.सी, एच.एस.सी, आणि इ.५वी व ८वी च्या शिष्यवृत्ती परीक्षांचे निकाल याबद्दल पालकांना माहिती देण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार व इतर शिक्षकांनी प्रशालेचे नियम, बदललेल्या तासिका, डबा, दैनंदिन शिस्त, अवांतर वाचन, विविध भाषांमधील बातम्या वाचणे, ऐकणे, खेळ, भविष्यातील उत्तम करिअरसाठी तयारी, शालेय व्यवस्थापन इ. सर्व विषयांवर चर्चा केली. इ.५वी व ८वी च्या शिष्यवृत्ती परीक्षा, N.T.S, M.T.S, NMMS, डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा, चित्रकला ग्रेड परीक्षा, पायाभूत इ. सर्व परीक्षांबद्दल पालकांना माहिती देण्यात आली. चित्रकला स्पर्धां, शिष्यवृत्ती परीक्षा, तसेच इ.१०वी चे ज्यादा वर्ग याबद्दल पालकांना माहिती देण्यात आली. प्रत्येक तुकडीतून पालक प्रतिनिधींची निवड करण्यात आली.

### गुरुपौर्णिमा

गुरुवार दि. १३ जुलै २०१७ रोजी गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख पाहुण्या म्हणून विद्याभवन नं. २ च्या माजी मुख्याध्यापिका व समन्वयक श्रीमती सरला नरेंद्रन या होत्या.

श्री सरस्वतीच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी ईशस्तवन, गीते, नृत्ये, गोष्टी इत्यादी बहारदार कार्यक्रम सादर केले. मुख्याध्यापिका योगिनी पोतदार, उप मुख्याध्यापिका श्रीमती सुरेखा लअुळकर, सहा. शिक्षक ज्ञानेश्वर दाते यांनी विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेचे महत्व सांगितले.

### सैनिकांस पत्ररुपी राखी

दि. १५ जुलै २०१७ रोजी 'झी २४ तास' या वृत्तवाहिनीतर्फे वार्तादूत ''धागा शौर्य का, राखी अभिमान की'' हा उपक्रम प्रशालेत राबविला गेला.

भावाबहिणीचे नाते दृढ करणारा राखीचा रेशमी धागा अतुट असतो. झी २४ तासच्या टीमने नेमका असाच धागा पकडून भारतीय सीमेवर झी २४ यांनी डोळ्यात तेल घालून देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिक बांधवांना संदेशाची पत्ररुपी राखी पाठविण्याची सुवर्णसंधी प्राप्त करुन दिली. प्रशालेच्या सेमिनार हॉलमध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. इंग्रजी व मराठी माध्यमाचे सुमारे ६०० विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते.

रक्षाबंधन आणि स्वातंत्रदिन या दोन्ही महत्वाच्या सणांची उत्तम गुंफण करुन विद्यार्थ्यांनी सीमेवरील सैनिकांना शौर्याच्या धाग्याची, देशाभिमानाची पत्ररुपी व काव्यरुपी रक्षाबंधनाचा संदेश पाठवला.

वार्ताहरांनी विचारलेल्या प्रश्नांना कु. प्रज्वल सांगळे, कु. सानिका पवार व कु. मानसी आव्हाड यांनी उत्तरे दिली. मुख्यध्यापिका श्रीमती पोतदार यांनी मनोगत व्यक्त केले.

''जय जवान, जय हिंद'' च्या घोषणा देत देशप्रेमाची साद घालत या उपक्रमाची मोठ्या उत्साहात सांगता झाली.

### निसर्ग मंडळ - राखी प्रदर्शन

दि. ३१.७.२०१७ रोजी राष्ट्रीय हरित सेना अंतर्गत निसर्ग मंडळ आयोजित राखी प्रदर्शन भरविण्यात आले होते. रक्षाबंधनाचा - ऋणानुबंधानाचा धागा जोडण्याचा एक स्तुत्य उपक्रम होता. विद्यार्थ्यांनी खूप सुंदर राख्या बनविल्या

होत्या. विद्यार्थ्यांमधील कल्पकता व सृजनशिलतेला उत्तम संधी मिळाली. सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक व अभिनंदन करुन मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी निर्सग मंडळाच्या भावी उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

**विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा**

दि. २० जुलै २०१७ रोजी इ. ९वी-१० वी गटातील विद्यार्थ्यांची विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली.

| क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता |
|---|---|---|
| प्रथम | कु. प्रथमेश पोपट पानसरे | १0वी ब |
| | कु. विवेक सचिन बलदवा | |
| | कु. हर्ष अनिल आवळेगावकर | |
| द्वितीय | कु. चिन्मय अजित पटाडे | ९वी अ |
| | कु. अनुराग बाळू सांगळे | |
| | कु. श्रेया श्रीकृष्ण वेदपाठक | |
| तृतीय | कु. सैफ अस्लम शेख | ९वी क |
| | कु. स्नेहा रमेश सुंबे | |
| | कु. श्रावणी महेंद्र कारभारी | |

## विद्याभवन नं.२
## मुख्याध्यापिका सौ. उमा गोपाकृष्णन

### निसर्ग मंडळ अंतर्गत दिंडीचे आयोजन

निसर्ग मंडळ अंतर्गत आषाढी एकादशीनिमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले. सदर दिंडीमध्ये इयत्ता ५वी व ६वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहभागी विद्यार्थी पारंपारिक पोषाखात उपस्थित होते. दिंडी दरम्यान विठ्ठल नामाचा जयघोष करत भक्ती गीतांचेही गायन करण्यात आले. सदर दिंडी विद्यालयाच्या प्रांगणातून फिरविण्यात आली.

निसर्ग मंडळातर्फे या दिंडीचे नियोजन प्रशालेचे शिक्षक श्री. ज्ञानेश्वर धुमाळ, श्री. सुहास गरदडे व निसर्ग मंडळाचे स्वयंसेवकांनी केले.

### निसर्ग मंडळ अंतर्गत औषधी वनस्पती प्रदर्शनाचे आयोजन

सोमवार दि. १७ जुलै २०१७ रोजी विद्याभवन-मध्ये निसर्ग मंडळ उपक्रमांतर्गत औषधी वनस्पतींचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

सदर प्रदर्शनामध्ये इयत्ता ७वी व ८वी च्या एकूण ६0 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रदर्शनामध्ये आले, कडुनिंब, कडीपत्ता, तुळस, पुदीना यासारख्या अनेक औषधी वनस्पती प्रदर्शनामध्ये मांडल्या होत्या. या प्रदर्शनास विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर व सर्व विद्यार्थ्यांनी भेट दिली. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शिक्षिका सौ. संगिता मुंढे व निसर्ग मंडळाचे स्वयंसेवक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### मराठी वाङ्मय मंडळ - गुरुपौर्णिमा विशेष कार्यक्रम

बुधवार दि. १९.७.२०१७ रोजी मराठी वाङ्मय मंडळाने गुरुपौर्णिमा उत्सव साजरा केला. याप्रसंगी गुरुस्तुतीपर गीते, भाषणे तसेच एकपात्री प्रयोग आदि विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. व्यास मुनींच्या प्रतिमेस मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केला व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांनी मराठी विषय शिक्षिका श्रीमती मीना गायकवाड यांच्या मदतीने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मुख्याध्यापिका श्रीमती उमा गोपालकृष्णन् यांनी त्यांच्या भाषणात विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि गुरुवंदना करुन कार्यक्रमाची सांगता झाली.

### निसर्ग मंडळ - राखी प्रदर्शन

शुक्रवार दि. २८ जुलै २०१७ रोजी विद्याभवनमध्ये रक्षाबधनानिमित्त राखी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. सदर प्रदर्शनामध्ये इ. ५वी व ६वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. निसर्गास हानिकारक असणाऱ्या घटकांचा वापर न करता बनवलेल्या इको फ्रेंडली राख्या प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या. प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या राख्यांची विक्री सुध्दा करण्यात आली. या प्रदर्शनास विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी निसर्ग मंडळ स्वयंसेवकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## विद्याभवन नं. २ प्राथमिक मराठी
## मुख्याध्यापक श्री. गणेश सुदाम कणसे

**शाळेचा पहिला दिवस**

दि. १५ जूनला शाळा सुरु झाली. पहिल्या दिवशी पाठयपुस्तक वाटपाला सुरुवात करण्यात आली. मुलांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

**आषाढी एकादशी**

आषाढी एकादशीनिमित्त शालेय परिपाठामध्ये आषाढी एकादशीचे महत्व सांगण्यात आले. विठुनामाचा गजर करण्यात आला. पंढरपूरला विविध ठिकाणांहून येणाऱ्या पालख्यांचे महत्व सांगण्यात आले.

इ.३री व ४थी च्या विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचा पोशाख केला होता. पालखीला फुलांनी छान सजवण्यात आले होते. मुख्याध्यापकांच्या हस्ते विठ्ठलाच्या प्रतिमेचे पूजन करुन आरती म्हणण्यात आली. छोटया वारकऱ्यांनी विठ्ठलाच्या गाण्यांवर रिंगण घातले. टाळ-चिपळ्यांच्या गजरात आणि 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल', 'ग्यानबा तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय' या जयघोषात वारकऱ्यांनी शाळेला प्रदक्षिणा घातली आणि अवघा परिसर विठुमय होऊन गेला.

## पूर्व प्राथमिक मराठी

**आषाढी एकादशी**

दि. ४.७.२०१७ रोजी आषाढी एकादशीनिमित्त दिंडी काढण्यात आली. मोठया शिशु वर्गाच्या विद्यार्थ्यांनी संत तुकाराम, विठोबा-रखुमाई, संत एकनाथ अशा विविध वेशभूषा केल्या होत्या. 'ग्यानबा तुकाराम, ज्ञानोबा तुकाराम' या गजरात छोट्या व मोठ्या शिशुच्या मुलांनी शाळेभोवती दिंडी प्रदक्षिणा करुन, सर्व मुलांना प्रसाद म्हणून राजगीरा लाडूचे वाटप करण्यात आले.

**दीपपूजा**

दि. २१.७.२०१७ रोजी शाळेत दीपपूजा उत्सव साजरा करण्यात आला. मंदिरासमोर रांगोळी काढून त्याभोवती पणत्या मांडण्यात आल्या. माध्यमिक मराठी विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. पोतदार, उपमुख्याध्यापिका सौ. लउळकर, पर्यवेक्षिका सौ. निमकर यांच्या हस्ते दीप-प्रज्वलन करण्यात आले. नंतर छोट्या व मोठ्या शिशुच्या मुलांना दिव्याचे महत्व सांगून त्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

✻✻✻

---

**समाचार दुरुस्ती माहे ऑगस्ट २०१७**
**पृष्ठ क्र. ३०**

### श्री. रघुनाथ वासुदेव उपाध्ये व सौ. सुजाता रघुनाथ उपाध्ये, पुणे देणगी रु. ५,०००/-

श्री. रघुनाथ वासुदेव उपाध्ये व सौ. सुजाता रघुनाथ उपाध्ये यांनी दि. २०.६.२०१७ रोजी रु. ५,०००/- ची देणगी कै. केदार रघुनाथ उपाध्ये (मा. वि.) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीच्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी आश्रमीय गरीब, गरजु, होतकरु अशा इ. १० वी च्या विद्यार्थ्यांला एस. सी. सी. बोर्डाची फी भरण्यासाठी करण्यात येईल.

### श्रीमती दिप्ती मधुकर पाठक, पुणे
### देणगी रु. २,०००/-

श्रीमती दिप्ती मधुकर पाठक यांनी दि. २०.६.२०१७ रोजी रु. २,०००/- ची देणगी कै. मधुकर गोविंद पाठक यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ९ जुलै २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना भोजनामध्ये मिष्टान्न देण्यासाठी करण्यात आला.

✻✻✻

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र कांबळे**
**प्र. प्राचार्या : सौ. नूतन बापट**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. उत्कर्षा केणी**

**अभिनंदनीय**

❋ माध्यमिक विभागातील कु. **कनिष्का ढोले (इ. १०वी ब) या विद्यार्थिनीने दि. २६ जुलै ते २९ जुलै २०१७ रोजी नगर येथे भरलेल्या झोनल लेव्हल स्पर्धांत गोळाफेक व थाळीफेक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले.** जिल्हा पातळवरील स्पर्धांसाठी तिची निवड झाली आहे. दि. १६ ते १८ ऑगस्ट २०१७ दरम्यान चिपळूणमधील डेरवण येथे आयोजित झालेल्या **महाराष्ट्र स्टेट ज्युनियर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धांत गोळाफेक स्पर्धेत रजत पदक व थाळीफेक स्पर्धेत तिने कांस्यपदक पटकावले.** राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे.

❋ कु. जेसन मेहता (इ. १०वी ड) याने बालेवाडी, पुणे येथे जुलै २०१७ मध्ये आयोजित झालेल्या 'पुणे डिस्ट्रिक्ट ज्युनियर ॲथलेटिक्स मीट (२०१७)' स्पर्धांत हॅमर थ्रो स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला. राहुरी, अहमदनगर येथे दि. ५ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०१७ दरम्यान झालेल्या झोनल स्पर्धेसाठी त्याची निवड झाली.

❋ कु. आदित्य भरगुडे (इ. ९वी अ) व कु. आदित्य पवार (इ. ९वी ब) या विद्यार्थ्यांनी जयपूर, राजस्थान येथे दि. २३ जुलै ते २७ जुलै २०१७ रोजी झालेल्या इंटरनॅशनल मार्शल आर्ट्स संस्थान, कराटे दो चॅम्पियनशिप मध्ये भाग घेतला. त्यांनी टीम इंडिया १४ ते १५ वयाच्या गटात प्रतिनिधित्व केले. या स्पर्धेत त्यांनी **रजत पदक** मिळविले. त्यांची IMAS संघात निवड झाली आहे.

❋ माध्यमिक विभागातील इयत्ता ९वी तील NCC कॅडेट्सनी पुणे येथे दि. २९ जुलै ते ७ ऑगस्ट २०१७ या कालावधीत CATC ७०९ कॅम्पला हजेरी लावली. त्यांनी तेथे आयोजित झालेल्या विविध स्पर्धांत सुयश मिळविले. **संचलनात व सांस्कृतिक नृत्य कार्यक्रमात त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला.**

❋ पोस्टर मेकिंग स्पर्धेत कॅडेट कु. क्षितिजा वाघ व कु. अद्विका वेल्हणकर यांनी **द्वितीय क्रमांक** मिळविला. नृत्य स्पर्धेत कु. क्षितिजा वाघ या विद्यार्थिनीने **प्रथम क्रमांक** मिळवला. एकूण ११ विद्यार्थिनी सदर शिबिरात सहभागी झाल्या होत्या.

❋ **कु. आदित्य शिंगोटे (इ. ९वी इ) याने दि. २९ जुलै २०१७ रोजी ४थ्या राज्यस्तरीय तायक्वोंदो चॅम्पियनशिप स्पर्धेत भाग घेऊन सुवर्णपदक जिंकले.**

❋ कु. आकांक्षा उकरांडे (इ. ६वी इ) हिने धनकवडी, पुणे येथे दि. ६ ऑगस्ट २०१७ रोजी आयोजित झालेल्या जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत कांस्य पदक पटकावले.

❋ कु. वैष्णवा काटके (इ. ७वी क) या विद्यार्थ्यानि दि. १३ ऑगस्ट २०१७ रोजी ट्रिनिटी स्पोर्ट्स ॲकॅडमीने आयोजित केलेल्या पहिल्या SKIF नॅशनल चॅम्पियनशिप स्पर्धांत काथा स्पर्धेत व Kumite स्पर्धेत कांस्यपदक मिळविले.

❋ कु. सुफियान शेख (इ. ६वी इ) याने दि. १६ व १७ ऑगस्ट २०१७ रोजी जनरल अरुणकुमार वैद्य स्टेडियमवर जिल्हा क्रीडा परिषद, पुणे यांनी आयोजित केलेल्या आंतरशालेय मुष्टियुद्ध स्पर्धेत १४ वर्षे वयोगटांतर्गत प्रथम क्रमांक मिळवला, तर कु. अथर्व बिडकर (इ. ६वी ब) याने द्वितीय क्रमांक पटकावला. डिव्हिजन लेव्हल स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे.

**इंग्रजी निबंध स्पर्धा**

माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी निबंध स्पर्धा दि. १५ जुलै २०१७ रोजी आयोजित

करण्यात आली होती. त्याचा निकाल खालीलप्रमाणे :

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. गायत्री दामले | इ. ९वी ब | प्रथम |
| कु. अमिता जांभळे | इ. ५वी अ | द्वितीय |
| कु. देवेन कालगावकर | इ. १०वी इ | द्वितीय |

**चित्रकला व हस्तकला स्पर्धा**

माध्यमिक विभागातील इ. ५ वी ते ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व इ. ८वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी हस्तकला व स्लोगन स्पर्धा दि. २५ जुलै २०१७ रोजी घेण्यात आल्या. त्याचा निकाल पुढीलप्रमाणे :

**इ. ५वी ते ७वी : चित्रकला स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| कु. शर्वरी उंड्रे | इ. ६वी इ | प्रथम |
| कु. किंजल जैन | इ. ७वी ब | द्वितीय |
| कु. अर्जुन देशमुख | इ. ५वी अ | द्वितीय |

**इ. ८वी ते १०वी : हस्तकला व स्लोगन स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| कु. राजदत्त मालुसरे | इ. १०वी इ | प्रथम |
| कु. अमिता जांभळे | इ. १०वी अ | द्वितीय |
| कु. आदित्य कुलकर्णी | इ. ८वी अ | द्वितीय |

**श्लोक पठण स्पर्धा**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने शाळेच्या पूर्व-प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी दि. २८ जुलै २०१७ रोजी श्लोक पठण स्पर्धा आयोजित केली होती. यामध्ये छोट्या गटासाठी 'मनाचे श्लोक' व मोठ्या गटासाठी 'पसायदान' असे श्लोक देण्यात आले होते. विद्यार्थ्यांकडून या स्पर्धेसाठी मोठा प्रतिसाद मिळाला.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्राथमिक विभागाच्या शिक्षिका सौ. क्षमा हर्डीकर व सौ. श्रेया सावंत यांनी तसेच मोठ्या गटासाठी तसेच शिक्षिका सौ. मेघा दिक्षीत व सौ. शिल्पा पाटील यांनी छोट्या गटासाठी काम पाहिले.

**चित्रकला स्पर्धा**

प्राथमिक विभागातील इ. १ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांसाठी 'नवनीत मास्टर स्ट्रोक चित्रकला' स्पर्धेचे आयोजन दि. ५ ऑगस्ट २०१७ रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी 'माझे आवडते फळ, फुलपाखरू व माझी आवडती खेळणी' हे विषय इ. १ली ते ३री साठी देण्यात आले होते व इ. ४थी साठी 'भारतीय फौज', 'पाण्यातले खेळ', 'माझे गाव' हे विषय दिले होते. स्पर्धेचे आयोजन शिक्षिका सौ. स्वाती महाजन यांनी केले होते.

या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :

**इ. १ली**

| | |
|---|---|
| कु. लक्षिता भुरूक | इ. १ली अ |
| कु. अस्मी अरडे | इ. १ली अ |
| कु. विक्रमादित्य गायकवाड | इ. १ली ब |
| कु. पृथा हुंडेकरी | इ. १ली ब |
| कु. अर्जुन महाडिक | इ. १ली क |
| कु. कृष्णा कटके | इ. १ली क |
| कु. शौर्य नाईक | इ. १ली ड |
| कु. अनघा निंबाळकर | इ. १ली ड |
| कु. सई झारगड | इ. १ली इ |
| कु. नितिषा थोपटे | इ. १ली इ |

**इ. २री**

| | |
|---|---|
| कु. धनराज बारटक्के | इ. २री अ |
| कु. अनुज चव्हाण | इ. २री अ |
| कु. सई गरूड | इ. २री ब |
| कु. लावण्या गायकवाड | इ. २री ब |
| कु. सारा मिसाळ | इ. २री क |
| कु. सह्याद्री खामकर | इ. २री क |
| कु. जान्हवी पाटील | इ. २री ड |
| कु. किर्ती राऊत | इ. २री ड |
| कु. अवधूत वाघचौरे | इ. २री इ |
| कुमारी सामिया तांबोळी | इ. २री इ |

**इ. ३री**

| | |
|---|---|
| कु. समर्थ ढेपे | इ. ३री अ |
| कु. शार्दुल देशमुख | इ. ३री अ |
| कु. ओंकार गंगावणे | इ. ३री ब |
| कु. पार्थ गवळी | इ. ३री ब |
| कु. राघवेन्द्र कुलकर्णी | इ. ३री क |
| कु. शीवेंद्र कोंढरे | इ. ३री क |

| | |
|---|---|
| कु. पवित्रा पल्लेरा | इ. ३री ड |
| कु. रिया नवगेकर | इ. ३री ड |
| कु. मृणाल शेटे | इ. ३री इ |
| कु. रिया राऊत | इ. ३री इ |

**इ. ४थी**

| | |
|---|---|
| कु. श्रीया गरूड | इ. ४थी अ |
| कु. सोहम देशपांडे | इ. ४थी अ |
| कु. प्रथम कदम | इ. ४थी ब |
| कु. हिमांशू गिलानकर | इ. ४थी ब |
| कु. सृष्टी कालगावकर | इ. ४थी क |
| कु. संस्कृती कदम | इ. ४थी क |
| कु. अनुराग परकड | इ. ४थी ड |
| कु. स्नेहा नलावडे | इ. ४थी ड |
| कु. श्रेयांक वानखेडे | इ. ४थी इ |
| कु. स्मित सुपेकर | इ. ४थी इ |

### इंग्रजी निंबध लेखन स्पर्धा

प्राथमिक विभागातील इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे आयोजन शिक्षिका सौ. अर्चना सुदन यांनी केले होते. प्रत्येक इयत्तेसाठी वेगवेगळे विषय देण्यात आले होते. या स्पर्धेसाठी सौ. कोमल कुलकर्णी, सौ. शिरीन अकोलावाला, सौ. मनिषा नाईक व सौ. केतकी पुजारी या शिक्षिकांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| कु. नंदिनी सागडे | इ. १ली ड | प्रथम |
| कु. वेदिका जाधव | इ. १ली ब | द्वितीय |
| कु. अश्लेषा थोपटे | इ १ली इ | द्वितीय |
| कु. जय बारमुख | इ. २री अ | प्रथम |
| कु. श्लोक खेडेकर | इ. २री क | द्वितीय |
| कु. ज्ञानेश्वरी फुले | इ. २री ड | द्वितीय |
| कु. राघवेन्द्र कुलकर्णी | इ. ३री क | प्रथम |
| कु. रिया राऊत | इ. ३री इ | द्वितीय |
| कु. वेद कडेकर | इ. ४थी ब | प्रथम |
| कु. सृष्टी कालगावकर | इ. ४थी क | द्वितीय |
| कु. हर्षवर्धन उबाळे | इ. ४थी इ | द्वितीय |

### नागपंचमी

पूर्व-प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी दि. २७ जुलै २०१७ रोजी नागपंचमी हा सण उत्साहात साजरा करण्यात आला.

पूर्व-प्राथमिक विभागातील छोट्या व मोठ्या गटाने कागदाचे नाग करून चित्रकलेच्या वहीत चिकटवून त्यापुढे वारूळ गवत काढून सजविले.

श्रावण महिन्यातील पहिला महत्त्वाचा सण म्हणजे नागपंचमी. कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले तो दिवस म्हणजे श्रावण शुद्ध पंचमी, नागपंचमी. या दिवशी नागपंचमी हा सण साजरा केला जातो.

### संस्कृत दिन

दि. ९ ऑगस्ट २०१७ रोजी संस्कृत दिन साजरा करण्यात आला. शास्त्रीय भाषा म्हणून जी भाषा जगप्रसिद्ध आहे, तिला जागतिक स्तरावर नेण्यासाठी, संस्कृत भाषेचा दैनंदिन व्यवहारात जास्तीत जास्त वापर होण्यास प्रोत्साहन मिळावे या हेतूने दिनांक ७ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट २०१७ या दरम्यान देशभर विविध संस्कृत उपक्रम घेण्यात आले.

शाळेने आयोजित केलेल्या संस्कृत-दिनाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी संस्कृतचे महत्त्व सांगणारी छोटी भाषणे, संस्कृत गीते, विनोद, बातम्या, कथा इत्यादी कार्यक्रम सादर करून रंगत आणली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालनही संस्कृत भाषेतूनच करण्यात आले.

### भारताचा स्वातंत्र्यदिन समारंभ

मुक्तांगण शाळेत भारताचा ७१वा स्वातंत्र्यदिन समारंभ मंगळवार दिनांक १५ ऑगस्ट २०१७ रोजी उत्साहात साजरा झाला.

याप्रसंगी पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे, कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर, संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर व श्री. आनंद कुलकर्णी तसेच अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेश नेरकर, बी.सी.एस. कॉलेजच्या प्राचार्या सौ. सुरेखा देशमुख हे उपस्थित होते.

याचबरोबर प्रभारी प्राचार्या सौ. नूतन बापट, उपमुख्याध्यापिका सौ. हेमांगिनी इनामदार, प्रभारी मुख्याध्यापिका सौ. उत्कर्षा केणी तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रमुख सौ. मीना राणे, चारही विभागीतील अध्यापक वर्ग, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालकवर्ग या समारंभास उपस्थित होते.

कार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे यांचे हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. सर्वांनी जनगणमन हे राष्ट्रगीत गाऊन ध्वजास मानवंदना दिली. त्यानंतर जनरल सेक्रेटरी कु. प्रियंका कुलकर्णी हिने प्रतिज्ञा म्हटली व सर्व उपस्थितांनी प्रतिज्ञेचा पुनरुच्चार केला.

कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख सौ. मीना राणे यांनी आपल्या भाषणात देशाच्या स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करलेल्या देशभक्त भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांचा उल्लेख केला व आजच्या पिढीने या देशभक्तांच्या बलिदानाची आठवण ठेवावी व आपल्या देशाबद्दल अभिमान बाळगावा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचा समारोप वंदे मातरम् ने झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी केले.

## गोकुळाष्टमी

पूर्व-प्राथमिक विभागातील मोठ्या व छोट्या गटाने गोकुळाष्टमी मोठ्या उत्साहात साजरी केली.

प्रत्येक वर्गाने स्वतंत्र दहिहंडी फोडण्याचा कार्यक्रम केला. दोन्ही गटातील मुले व मुली राधा, कृष्ण, गोपी व गोपिकेच्या वेशभूषेत दहिहंडी फोडण्याच्या कार्यक्रमानंतर मुलांना प्रसाद वाटप करण्यात आले.

गोकुळाष्टमीच्या निमित्ताने मोठ्या गटातील विद्यार्थ्यांसाठी चित्ररंगभरण स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्राथमिक विभागातील शिक्षिका सौ. संपदा पाटणकर व कु. कीर्ती देव यांनी काम पाहिले. तसेच छोट्या गटाने कागदाची दहिहंडी चित्रकलेच्या वहीत चिकटवून सजविली.

## अतिथी व्याख्यानमाला

शाळेच्या उच्च माध्यमिक विभागातील इ. १२वी च्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक २८ जुलै २०१७ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या व्याख्यानासाठी प्रमुख वक्त्या म्हणून सौ. सबा सय्यद या लाभल्या होत्या. त्यांनी 'व्यवसाय मार्गदर्शन' (करियर गाईडन्स) या विषयावर मार्गदर्शन केले. सौ. सबा सय्यद यांनी या व्याख्यानात विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या संधींबद्दल माहिती दिली. त्या-त्या व्यवसाय निवडीबद्दल विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी, त्यासाठी लागणाऱ्या प्रवेश परीक्षा अशा आणि इतर अनेक महत्त्वाच्या बाबींवर त्यांनी प्रकाश टाकला.

या व्याख्यानाचे आयोजन शिक्षिका सौ. निधी दिक्षीत यांनी केले. स्वागत आणि सूत्रसंचालन शिक्षिका सौ. प्रिती मराठे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी प्रभारी प्राचार्या सौ. नूतन बापट व उच्च माध्यमिक विभागाच्या प्रमुख सौ. मीना राणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

उच्च माध्यमिक विभागातील इ. १२वी च्या विद्यार्थ्यांसाठी दि. ३ ऑगस्ट २०१७ रोजी 'मराठी काका' म्हणून ओळखल्या जाणारे प्रा. अनिल गोरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी १२वी च्या बोर्डाच्या परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र यांची उत्तरे मातृभाषेतून लिहिण्याची शिक्षण मंडळाने जी सोय केली आहे, त्याबद्दलची विस्तृत आणि उपयुक्त अशी माहिती सांगितली.

## राख्या तयार करणे

पूर्व-प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी दि. ४ ऑगस्ट २०१७ रोजी शिक्षकांच्या मदतीने सुंदर राख्या तयार केल्या. चित्रकलेच्या वहीत हाताचे मनगटापासून चित्र काढून या तयार केलेल्या राख्या त्या मनगटावर चिकटवून घेतल्या.

यासाठी प्रभारी मुख्याध्यापिका सौ. उत्कर्षा केणी, पर्यवेक्षिका सौ. गीता उद्गीर व सौ. अनुपमा गुजराथी, पूर्व-प्राथमिक विभागाच्या शिक्षक प्रतिनिधी सौ. मेघना

कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.

### चित्रपट सादरीकरण

सिनियर के.जी. ते ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी दि. ४ ऑगस्ट ते १० ऑगस्ट २०१७ रोजी चित्रपटाचे सादरीकरण करण्यात आले. पूर्व-प्राथमिक विभागातील छोट्या गटाला दि. ४ ऑगस्ट २०१७ रोजी 'रूम ॲण्ड ब्रुम' तर दि. १० ऑगस्ट २०१७ रोजी मोठ्या गटाला 'मॅश ॲण्ड बेर' व काही इंग्रजी गाणी दाखविण्यात आली. यावेळी इ. १ली व ४थी च्या विद्यार्थ्यांना (Rio) पक्ष्यांवर आधारित इंग्रजी कार्टुन चित्रपट दाखविण्यात आला. इ. २री व इ. ३री च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक समस्येवर आधारित 'श्यामची शाळा' हा चित्रपट दाखवण्यात आला. दृकश्राव्य माध्यमातून हे चित्रपट विद्यार्थ्यांना दाखविल्यामुळे त्यांनी चित्रपटाचा आनंद लुटला. प्राथमिक विभागासाठी या कार्यक्रमाचे आयोजन शिक्षिका सौ. शिल्पा पाटील यांनी केले होते. शाळेच्या सल्लागार सौ. मधुरा काळे यांनी या उपक्रमाची जबाबदारी सांभाळली.

सर्व शिक्षा अभियानातर्फे शाळेतील ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांना दि. ८ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट २०१७ रोजी 'श्यामची शाळा' हा मराठी चित्रपट दाखविण्यात आला. साईनाथ चित्रसंस्थेतर्फे श्रीमती प्रतिभा पाटील यांनी हा चित्रपट विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला. शिक्षण सर्वांसाठी अत्यावश्यक आहे हा संदेश देणाऱ्या या चित्रपटाचा विद्यार्थ्यांनी मनापासून बोध घेतला.

माध्यमिक विभागाच्या शिक्षक प्रतिनिधी सौ. विद्या सालेहित्तल यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

### इंटरॅक्ट क्लबची स्थापना

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या इंटरॅक्ट क्लबची स्थापना दि. २८ जुलै २०१७ रोजी संपन्न झाली. रोटरी क्लब, पुणे-कात्रज शाखेचे अध्यक्ष श्री. अनंत तिकोने तसेच श्री. प्रमोद जेजुरीकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.प्रभारी प्राचार्या सौ. नूतन बापट, उपमुख्याध्यापिका सौ. हेमांगिनी इनामदार तसेच इंटरॅक्ट क्लबच्या सभासद असलेल्या शालेय शिक्षिका सौ. सोनल कुलकर्णी, सौ. श्रद्धा लाळे व सौ. निकिता झरेकर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. शाळेतील संगीतगटाने स्वागतपर गीत सादर केले. प्रमुख पाहुणे व उपस्थितांचे स्वागत शिक्षिका सौ. श्रद्धा लाळे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय श्री. गौतम इनामदार यांनी करून दिला. प्रभारी प्राचार्या सौ. नूतन बापट यांनी प्रमुख पाहुणे व इतर मान्यवरांचा सत्कार केला.

इंटरॅक्ट क्लबविषयी श्री. पुष्कराज मुळे यांनी माहिती दिली. या कल्बतर्फे ई-वेस्ट, धान्य इ. देणगी स्वीकारली जाऊन गरजूंना देण्यात येते. अनेक लोकोपयोगी कार्ये या क्लबतर्फे केली जातात. श्री. प्रमोद जेजुरीकर यांनी २०१७-१८ च्या इंटरॅक्ट क्लबची स्थापना झाल्याचे घोषित केले. शाळेतील इ. ९वी तील विद्यार्थी कु. निनाद मोरे व कु. मधुरा बनसोडे इंटरॅक्ट क्लबचे सेक्रेटरी म्हणून निवडले गेले आणि त्यांनी सर्वांशी आपल्या भाषणातून संवाद साधला.

श्री. अनंत तिकोने यांनी आपल्या भाषणात साहस हे वयावर अवलंबून नसते, माणूस कोणत्याही वयात थोर कामगिरी करू शकतो असे विचार मांडले व त्या संदर्भातील गोष्टही सांगितली.

प्रमुख पाहुणे श्री. जेजुरीकर यांनी आपल्या भाषणात तरूण मुलांनी समाजाला मदत करणे हे आपले कर्तव्य आहे याची जाणीव ठेवावी असे मत प्रतिपादित केले.

रोटरी क्लबच्या सौ. निर्मला माळी यांनी आभार मानले व वन्दे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता झाली.

### प्राचार्यांचे अभिभाषण

शाळेच्या उच्च माध्यमिक विभागातील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये इयत्ता ११वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्राचार्यांच्या अभिभाषणाचे आयोजन दि. ९ ऑगस्ट २०१७ रोजी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रभारी प्राचार्या सौ. नूतन बापट यांनी

विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच उपमुख्याध्यापिका सौ. हेमांगिनी इनामदार यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून मोलाचे मार्गदर्शन केले.

उच्च माध्यमिक विभागाच्या प्रमुख सौ. मीना राणे यांनी महाविद्यालयाच्या कार्यपद्धतीची ओळख करून दिली. उच्च माध्यमिक विभागाच्या शिक्षक प्रतिनिधी सौ. कस्तुरी आपटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व शिक्षिका सौ. रश्मी वैद्य यांनी आभार प्रदर्शन केले.

## सायन्स क्लब व अॅस्ट्रॉनॉमी क्लबची स्थापना

दरवर्षीप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी इ. ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी सायन्स क्लब व इ. ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी अॅस्ट्रॉनॉमी क्लबची स्थापना दि. ११ ऑगस्ट २०१७ रोजी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्योतिर्विद्या परिसंस्थेचे प्रेसिडेंट प्रो. मुज्ताबा लोखंडवाला तसेच विशेष आमंत्रित म्हणून ज्योतिर्विद्या परिसंस्थेचे व्हाइस प्रेसिडेंट श्री. अनिरुद्ध देशपांडे व श्री. दीपक जोशी उपस्थित होते. प्रभारी प्राचार्या सौ. नूतन बापट व उपमुख्याध्यापिका सौ. हेमांगिनी इनामदार उपस्थित होत्या. माध्यमिक विभागातील शिक्षिका सौ. सुधा कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

'सर्व शास्त्रांचे मूल स्थान असलेली ज्योतिर्विद्या' या विषयावर प्रमुख पाहुणे श्री. लोखंडवाला यांनी आपले विचार व्यक्त केले. अॅस्ट्रॉनॉमी, अर्थात ज्योतिर्विद्या इतर अनेक क्षेत्रांशी संबंधित आहे. आपले ज्ञान वाढवण्याच्या दृष्टीने ज्योतिर्विद्येचे विश्वात मोठे योगदान आहे.

श्री. दीपक जोशी यांनी भारतातील सर्वात जुनी संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ज्योतिर्विद्या परिसंस्थेच्या कार्याचा परिचय दिला व देशपरत्वे दिनदर्शिका कशी तयार केली जाते या विषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तृप्ती मुळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. स्वाती पाठक यांनी केले.

## वृक्षारोपण व स्वच्छता अभियान

दिनांक १२ ऑगस्ट २०१७ रोजी स्वच्छता समिती, नेचर क्लब व शालेय एन.सी.सी. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सदर वृक्षारोपण व स्वच्छता अभियान उपक्रम पार पडला. मुक्तांगण शाळेच्या आवारात वृक्षराजीची हिरवाई असली तरीही शालेय विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाचे महत्त्व कळावे यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता.

प्रभारी मुख्याध्यपिका सौ. नूतन बापट यांनीही तुळशीचे रोप लावले व वृक्षारोपणाचे महत्त्व सांगितले. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या की तुळशीचे रोप हवेत प्राणवायू सोडते व हवा शुद्ध करते. या रोपात औषधी गुणही आहेत. सर्दी व खोकला रोगावर हे गुणकारी आहे. आपल्या घरात कोणतीही झाडे ठेवणे आरोग्याला हितावह नसते पण तुळशीचे रोप घरात किंवा घराबाहेर लावणे हितावह ठरते.

इ. ८वी तील कु. मल्हार रायरीकर याने १९५० पासून जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात साजऱ्या केल्या जाणाऱ्या पर्यावरण दिनाबद्दल माहिती सांगितली.

'हम सब का एक ही नारा साफ सुथरा हो देश हमारा' या घोषणा देत शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळेचा परिसर, मैदान, शिक्षक कक्ष, पर्यवेक्षक कक्ष, कार्यालय यांची स्वच्छता केली. स्वच्छता समिती प्रमुख सौ. माधुरी शिंदे यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

एन.सी.सी. शिक्षिका सौ. अनिता गायगोले यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील एन.सी.सी. कॅडेट्सनीसुद्धा स्वच्छता अभियानात भाग घेतला.

## ओला व सुका कचरा वर्गीकरण उपक्रमांतर्गत जनवाणी फाऊंडेशन लघुचित्रपट

प्राथमिक विभागात दि. २२ व २३ ऑगस्ट २०१७ रोजी 'जनवाणी फाऊंडेशन' पुणे महानगर पालिका आयोजित ओला कचरा व सुका कचरा त्याचे वर्गीकरण यावर आधारीत लघुचित्रपट इ. ३री व ४थी च्या विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला.

'शून्य कचरा प्रणाली प्रकल्प' या कार्यक्रमाद्वारे पुणे महानगरपालिकेने हा उपक्रम राबवला. या लघुचित्रपटा द्वारे विद्यार्थ्यांना ओला व सुका कचरा कोणता? त्याचे वर्गीकरण कसे करावे ? ते का महत्त्वाचे आहे? हेही दृकश्राव्य माध्यमातून विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. तसेच त्यावेळी इको-फ्रेंडली पद्धतीने गणपती विसर्जन कसे करावे व घरच्या घरी गणपती विसर्जन केल्याने त्याचे काय फायदे होतात हेही विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन प्राथमिक विभागातील स्वच्छता समितीच्यावतीने करण्यात आले. ***

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : डॉ. टी. आर. गोराणे**

### श्री गणेशाची प्रतिष्ठापना

शुक्रवार दि. २५.८.२०१७ रोजी संस्था व विद्यालयाच्या आवारामध्ये श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी आकर्षक असे लेझिमनृत्य करुन श्री गणेशाची मिरवणूक काढली. त्यानंतर विधीवत पूजाअर्चा करुन गणेश प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर उपस्थित सर्व संस्था पदाधिकारी, शिक्षक, पालक, विद्यार्थी यांना सुंठवडा मिश्रित प्रसादाचे वाटप करण्यात आले.

### सामाजिक, शैक्षणिक चित्रपटांचे सादरीकरण

शनिवार दि. २६.८.२०१७ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळात विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी '६ गुण' हा शैक्षणिक, सामाजिक चित्रपट दाखवण्यात आला. शिक्षण विभागाच्या परवानगीने श्री. के. डी. कदम यांनी विद्यालयाशी संपर्क साधला होता. सदर चित्रपटातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी, त्या दूर करण्याचे कुटुंब व विद्यालयाचे प्रयत्न याबाबत शास्त्रीय आणि समर्पक माहिती दिली. सदर कार्यक्रमास मा. प्रा. डॉ. टी. आर. गोराणे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. श्री. के. डी. कदम यांना चित्रपट दाखविल्याबद्दल विद्यालयाच्यावतीने आभार मानण्यात आले.

### कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांना HIV Aids बाबत दृकश्राव्य व्याख्यानाचे आयोजन

महानगरपालिका, पुणे यांच्या आरोग्यविभागातर्फे कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अत्यंत भयानक अशा HIV Aids या दुर्धर रोगाविषयी श्रीमती मनिषा कुंडीकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह पीपीटी स्लाईड्द्वारे अतिशय महत्त्वाची माहिती दिली. HIV ग्रस्त व्यक्तीमध्ये रोग होण्याची कारणे, लक्षणे आणि यावर शासनामार्फत मोफत उपचार पद्धती याबद्दल विशेष माहिती दिली. शिवाय विद्यार्थ्यांनी या वयात अशा दुर्धर रोगाविषयी जागरुक राहून समाजामध्ये सातत्याने माहिती देत रहावी असे आवाहन केले. विद्यालयातर्फे श्री. अरविंद तुर्वनकर व श्री. रमेश चौधरी यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. ***


## विज्ञानावरील उपयुक्त पुस्तके

| | |
|---|---|
| १) शास्त्रीय उपकरणे व प्रयोग-भाग १ ते ४ | द्वा. वा. केळकर |
| २) विज्ञान रंजन कथा भाग १ ते २ | विवेक भालेराव |
| ३) जिज्ञासा विज्ञानाची भाग १ व २ | विवेक भालेराव |
| ४) खेळातील विज्ञान | डॉ. पां. वि. चंद्रात्रेय |
| ५) सूर्य एक तोंड ओळख | वसंत पां. नेने |
| ६) ढगांचे विज्ञान | वसंत पां नेने |
| ७) मुलांचे आकाश निरीक्षण | सुधाकर भालेराव |
| ८) विज्ञान शतपत्रे | सुधाकर भालेराव |

**पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन**
१७८६ सदाशिव पेठ, पुणे ३०

# विज्ञान महाविद्यालय, पुणे

**संचालक : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**

**प्र. प्राचार्या : सौ. सुरेखा देशमुख**

### स्वागत समारंभ

दि. ५.८.२०१७ रोजी महाविद्यालयामध्ये प्रथमवर्षाला प्रवेश घेतलेल्या मुलांसाठी स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी खेळ, कलागुणांना वाव देणारे कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आले होते, त्यास विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला.

### शपथविधी

भारत छोडो आंदोलनास ७५ वर्षे व भारतीय स्वातंत्र्यास ७० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मानव संसाधन विकास मंत्रालयाने व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने निर्देशित केल्याप्रमाणे विविध उपक्रमांपैकी सर्व विद्यार्थ्यांना शपथ देण्याचा उपक्रम दि. १४ ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी ११ वाजता घेण्यात आला. यामध्ये महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

### प्लेसमेंट सेल

प्लेसमेंट ॲक्टिव्हीटी अंतर्गत महाविद्यालयामध्ये विविध आयटी कंपन्यांना आमंत्रित करण्यात येते. यामध्ये शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ साठी माहे ऑगस्ट २०१७ मध्ये झालेल्या ॲक्टिव्हिटीचा तपशील पुढील प्रमाणे -

| कंपनी | पदवी अभ्यासक्रम-बी.एस्सी.(संगणकशास्त्र) पदव्युत्तर अभ्यासक्रम-एम.एस्सी. (संगणकशास्त्र) एम. सी. ए. (विज्ञान) निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|
| L & T | ७ |
| Web Tech | ७ |
| L & T | २ |

### पोस्टर मेकिंग स्पर्धा

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कल्पना शक्तीला वाव देण्यासाठी पुढील विषयांवर पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. यामध्ये १२ संघानी सहभाग घेतला. 1) Technology Addiction 2) Emerging E-Commerce technology trends 3) Pune as a Smart City 4) Say no to Corruption

या विषयांवर आधारित कल्पकरित्या पोस्टर बनविले. स्पर्धेचे परीक्षण गणित विभागाच्या प्रा. नीता रणभारे व इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे प्रा. श्री. रमाकांत भुजबळ यांनी केले. स्पर्धेचे आयोजन गणित विभागाच्या प्रा. सौ. मेधा तीसगावकर व संगणशास्त्र विभागाच्या प्रा. सौ. दिपाली थोरात यांनी केले होते.

### अभिनंदनीय



सौ. स्वाती जोशी

✻ संगणक शास्त्र विभागाच्या सहा. प्राध्यापिका सौ. स्वाती जोशी यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची संगणक शास्त्र अंतर्गत ''Fuzzy Association Rule Mining Measures & Applications'' या विषयावर पी. एच. डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांना डॉ. सौ. एस. सी. शिरवरईकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. सौ. स्वाती जोशी यांचा महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला.



प्रा. रमाकांत भुजबळ

✻ महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स विभागातील अधिव्याख्याता प्रा. रमाकांत भुजबळ एप्रिल २०१७ मध्ये झालेल्या सेट परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. त्यांचा महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला. ✻✻✻

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**संचालक : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. श्रीमती भारती पाटील**

## 'सायबर सुरक्षा' व्याख्यानाचे आयोजन

दि. १ ऑगस्ट २०१७ रोजी सायबर क्राईम बद्दलची माहिती व सुरक्षितता याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.. याप्रसंगी सहायक पोलिस निरीक्षक श्री. शेगार, सहायक पोलिस सहनिरीक्षक श्रीमती वर्मा, सायबर पोलिस शाखेतील श्री. पराग गायकवाड, श्री. भूषण देशमुख तसेच सायबर राजदूत श्री. हिरे व श्री. ओढेकर यांनी विद्यार्थ्यांना फेसबुक वापरणे, ऑनलाईन व्यवहार करणे यामध्ये सायबर क्राईम कसे घडते हे सांगितले. यालाच सायबरबुलींग असे म्हणातात. यापासून सुरक्षित कसे रहावे याबद्दल चित्रफितींच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. तसेच याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांमधून मंत्रीमंडळ स्थापन करण्यात आले व पदग्रहण सोहळा साजरा करण्यात आला.

## 'वाहतूक सुरक्षा' व्याख्यानाचे आयोजन

दि. २ ऑगस्ट २०१७ रोजी उच्च माध्यमिक विभागातील इ. १२ वी तील विद्यार्थ्यांसाठी महिंद्रा आणि कंपनीच्या वतीने वाहतूक सुरक्षा या विषयावर आधारित व्याख्यान आयोजित करण्यात आले. श्री. जासेफ यांनी वाहतूक सुरक्षा, वाहतुकीचे नियम व वाहन चालविताना घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले.

## संस्कृतदिन

दि. ५ ऑगस्ट २०१७ रोजी संस्कृत दिनानिमित्त विद्यालयात संस्कृत श्लोक पठण स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत विद्यालयामधील इयत्ता ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत भाषेबद्दल आवड निर्माण करणे तसेच संस्कृतचे महत्त्व जाणून घेणे, श्लोकांमधून तसेच विविध स्त्रोतांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करणे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषेमध्ये केले. संस्कृत विषयाच्या उपशिक्षिका सौ. गायत्री भानोसे यांनी मार्गदर्शन केले व स्पर्धेचे परिक्षण केले. प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. हार्दी श्रीखंडे | ९ वी अ |
| कु. केतकी परांजपे | ८ वी अ |
| कु. आर्या कुलकर्णी | ८ वी अ |

## स्वागत समारंभ

दि. ९ ऑगस्ट २०१७ रोजी उच्च माध्यमिक विभागातील इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी विद्यालयामध्ये असलेल्या सुविधा व इतर सर्व माहिती चलचित्रांच्या सहाय्याने पालक व विद्यार्थ्यांना देण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देऊन अभ्यासामध्ये नियोजनाचे महत्त्व समजावून सांगितले. मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी स्पर्धा परीक्षा व शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रमाबद्दल माहिती दिली. तसेच करीअर मार्गदर्शन केले. सर्व शिक्षकांनी पालक व विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विवेक चोथे यांनी केले. आभार प्रदर्शन सौ. सोनाली चंद्रात्रे यांनी केले.

## कराटे व जलतरण जिल्हास्तरीय स्पर्धेत घवघवीत यश

**क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी नाशिक आयोजित जिल्हास्तरीय कराटे व जलतरण स्पर्धेत विद्यालयाच्या खेळाडूंनी प्रथम क्रमांक मिळविला. त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.**

**दि. ९ ऑगस्ट २०१७ रोजी कराटे स्पर्धा विभागीय क्रीडा संकुल हिरावाडी येथे घेण्यात आल्या होत्या. तसेच २० ऑगस्ट २०१७ रोजी नाशिकरोड जलतरण तलाव येथे स्पर्धा घेण्यात आल्या. या दोन्ही स्पर्धेत विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संचालक श्री. संजय गुंजाळ, डॉ. निहार वाळिंबे तसेच मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

**समुहनृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त**

स्वातंत्र्य दिनानिमित्त भारतीय एकात्मता समितीच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी 'जो शहीद हुए है उनकी जरा याद करो' या संकल्पनेवर आधारीत देशभक्तीपर समूहनृत्य स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत शहरातील विविध माध्यमांच्या एकूण सोळा शाळांनी सहभाग घेतला. याप्रसंगी विविध गीतांच्या नृत्यसादरीकरणातून शहिदांच्या स्मृतींना उजाळा मिळाला. हा कार्यक्रम परशुराम सायखेडकर सभागृहात दि. १६ ऑगस्ट २०१७ रोजी सादर करण्यात आला. या स्पर्धेचे उद्घाटन 'दै. लोकमत' चे निवासी संपादक श्री. किरण अग्रवाल यांच्या हस्ते झाले. स्पर्धेमध्ये विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या **समुहनृत्याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रु. पाच हजार रोख, स्मृतीचिन्ह मिळाले.** याप्रसंगी संचालक डॉ. निहार वाळिंबे व श्री. संजय गुंजाळ, मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील, शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ✻✻✻

## ✻ संस्था मुख्यालय, पुणे ✻



देणगीदार श्री. रविंद्र रघुनाथ बाम यांनी दि. १.९.२०१७ रोजी संस्थेला रु. १,०५,५००/- ची भरीव देणगी दिल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, समवेत डावीकडून कुलसचिव श्री. सुनील रेडेकर, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले आणि संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी

# हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. राजेंद्र बोऱ्हाडे** **संचालक – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.७.२०१७ ते १५.७.२०१७**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

**देणगी रु. १०,००१/- वरील सर्व**

**सौ. सुवर्णा प्रकाश जोशी, पुणे**
**देणगी रु. २१,०००/-**

सौ. सुवर्णा प्रकाश जोशी यांनी दि. ९.७.२०१७ रोजी रु. २१,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना रोजच्या वापराचे कपडे घेण्यासाठी किंवा शैक्षणिक वर्ष २०१७ - २०१८ मध्ये शैक्षणिक साहित्य देण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. माधव मधुकर गोडबोले, पुणे**
**देणगी रु. २१,०००/-**

श्री. माधव मधुकर गोडबोले यांनी दि. ८.७.२०१७ रोजी रु. २१,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय गरीब, गरजु, होतकरु अशा विद्यार्थ्यांच्या योगक्षेम खर्चासाठी करण्यात येईल.

**पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी महामंडळ, मुंबई देणगी रु. १८,०००/-**

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी महामंडळ यांनी दि. ७.७.२०१७ रोजी रु. १८,०००/- ची देणगी मुक्ताबाई फणसे व निर्मला भोजने यांचे नावे पारितोषिक देण्यासाठी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रम वसतिगृहामधील १० विद्यार्थी, शिशुनिकेतन मधील ५ विद्यार्थी, मुक्तांगण इंग्लिश स्कूल (सदाशिव पेठ) शाखेचे ५ विद्यार्थी व मुक्तांगण इंग्लिश स्कूल (शिवदर्शन) प्राथमिकचे ५ विद्यार्थी, माध्यमिकचे ५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. ६००/- प्रमाणे वरील नावे शिष्यवृत्ती देण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. तुषार मकरंद ताम्हाणे,**
**देणगी रु. १६,०००/-**

श्री. तुषार मकरंद ताम्हाणे यांनी दि. १२.७.२०१७ रोजी रु. १६,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना सन २०१७ - १८ या वर्षासाठी शैक्षणिक मदत देण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. निलेश श्रीकृष्ण गोवंडे, पुणे**
**देणगी रु. १५,०००/-**

श्री. निलेश श्रीकृष्ण गोवंडे यांनी दि. ५.७.२०१७ रोजी रु. १५,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय, गरजु, हुशार, विद्यार्थ्यांच्या योगक्षेम खर्चासाठी करण्यात येईल.

**प्रा. नीता सुनिल शिरसाट, पुणे**
**देणगी रु. ११,०००/-**

प्रा. नीता सुनिल शिरसाट यांनी दि. ३.७.२०१७ रोजी रु. ११,०००/- ची देणगी चि. शिवम याचे वाढदिवसानिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग मराठवाड्यातील (दुष्काळग्रस्त) आश्रमीय गरीब, होतकरु व हुशार विद्यार्थ्यांच्या योगक्षेम खर्चासाठी करण्यात आला.

**श्री. दिनकर विठ्ठल गायकवाड, पुणे**
**देणगी रु. ११,०००/-**

श्री. दिनकर विठ्ठल गायकवाड दि. ९.७.२०१७ रोजी रु. १२,०००/- ची देणगी गुरुपौर्णिमेनिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ९.७.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्नासह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. शाम वामन रेडकर व सौ. अनुराधा शाम रेडकर, पुणे देणगी रु. १०,५००/-**

श्री. शाम वामन रेडकर व सौ. अनुराधा शाम रेडकर यांनी दि. ३.७.२०१७ रोजी रु. १०,५००/- ची देणगी कै. शांताबाई वामन रेडकर (५ ऑगस्ट) यांचे स्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी रु. ५,५००/- चा विनियोग दि. ५ ऑगस्ट २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्नासह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला. तसेच रु. ५,०००/- चा विनियोग आश्रम वसतिगृहातील इ. ८ वी व ९ वी मध्ये गणित व शास्त्र या विषयामध्ये प्रथम व द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यासाठी करण्यात येईल.

**डॉ. वसंत गजानन जोगळेकर, पुणे**

**देणगी रु. १०,००२/-**



गजानन जोगळेकर

डॉ. वसंत गजानन जोगळेकर यांनी दि. ८.७.२०१७ रोजी रु. १०,००२/- ची देणगी डॉ. कै. गजानन विनायक जोगळेकर (१० फेब्रुवारी) यांच्या स्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी पूर्वीच्या देणगीमध्ये समाविष्ट करुन येणाऱ्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

**श्री. नितिन गजानन पोवळे, पुणे**

**देणगी रु. १०,०००/-**



गजानन पोवळे

श्री. नितिन गजानन पोवळे यांनी दि. ८.७.२०१७ रोजी रु. १०,०००/- ची देणगी कै. गजानन बाळकृष्ण पोवळे व कै. मंगला गजानन पोवळे यांच्या पुण्यस्मरणार्थ प्रत्येकी रु. ५०००/- प्रमाणे दिलेली आहे. सदर देणगी पूर्वीच्या देणगीमध्ये समाविष्ट करुन येणाऱ्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यासाठी करण्यात येईल.

**देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-**

**डॉ. पांडुरंग गणेश कुलकर्णी, पुणे**

**देणगी रु. १०,०००/-**

डॉ. पांडुरंग गणेश कुलकर्णी यांनी दि. ३.७.२०१७ रोजी रु. १०,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग चि. आदित्य राजेंद्र गोरे (इ. ५ वी) या हुशार, होतकरु, गरीब विद्यार्थ्याच्या मदतीसाठी करण्यात येईल.

**सौ. राजश्री नरेंद्र रेवाळे, मुंबई**

**देणगी रु. ७,५००/-**



चि. ओम रेवाळे

सौ. राजश्री नरेंद्र रेवाळे यांनी दि. ६.७.२०१७ रोजी रु. ७,५००/- ची देणगी कु. ओम नरेंद्र रेवाळे (११ जुलै) याच्या वाढदिवसानिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १७.७.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना (मिष्टान्न साजुक तूपातील बेसन लाडूसह) संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**सौ. पद्मजा अरविंद पटवर्धन, पुणे**

**देणगी रु. ५,००१/-**



वसंत शेणोलीकर

सौ. पद्मजा अरविंद पटवर्धन यांनी दि. ११.७.२०१७ रोजी रु. ५,००१/- ची देणगी वडिल कै. वसंत श्रीपाद शेणोलीकर (१४ एप्रिल) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**सौ. उर्मिला महादेव कलशेट्टी, पुणे**

**देणगी रु. ७,५००/-**

सौ. उर्मिला महादेव कलशेट्टी यांनी दि. १४.७.२०१७ रोजी रु. ७,५००/- ची कै. कमलाबाई लिंगाप्पा कलशेट्टी यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्नासह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**सौ. प्रतिमा जयंत कुलकर्णी, पुणे**

**देणगी रु. ७,५००/-**

सौ. प्रतिमा जयंत कुलकर्णी यांनी दि. १४.७.२०१७ रोजी रु. ७,५००/- ची देणगी कै. सदाशिव शिवराम गाडगीळ यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ३१.७.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना (मिष्टान्न आम्रखंडासह) संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**देणगी रु. ४,००१/- ते रु. ५,०००/-**

**श्री. अनिल शिवाजी सातपुते, पुणे**

**देणगी रु. ५,०००/-**

श्री. अनिल शिवाजी सातपुते यांनी दि. ४.७.२०१७ रोजी रु. ५,०००/- ची देणगी चि. अद्वैत अनिल सातपुते (५ जुलै) याच्या वाढदिवसानिमित्त दिलेली आहे. सदर देणगीच्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी दि. ५ जुलै रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यासाठी करण्यात येईल.

**श्रीमती प्रतिमा वि. बिवलकर, श्री. यतिन्द्र वसंत गोखले, सौ. वैजयंती वसंत गोखले, ठाणे देणगी रु. ५,०००/-**

श्रीमती प्रतिमा वि. बिवलकर, श्री. यतिन्द्र वसंत गोखले, सौ. वैजयंती वसंत गोखले यांनी मिळून दि. ६.७.२०१७ रोजी रु. ५,०००/- ची देणगी आजोबा कै. अण्णाजी नारायण दानेकर व आजी कै. लक्ष्मीबाई आण्णाजी दानेकर (मिरज) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीच्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी भाद्रपद अमावस्या रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना भोजनामध्ये मिष्टान्न देण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. हेमंत बळवंत सैतवाडकर, पुणे**

**रु. ५,०००/-**



बळवंत सैतवाडकर



उर्मिला सैतवाडकर

श्री. हेमंत बळवंत सैतवाडकर यांनी दि. ६.७.२०१७ रोजी रु. ५,०००/- ची देणगी वडिल कै. बळवंत वासुदेव सैतवाडकर, आई कै. उर्मिला बळवंत सैतवाडकर आणि बंधु कै. संजीव बळवंत सैतवाडकर यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीच्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी आषाढ वद्य ३० रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. धनंजय जनार्दन शहाणे, पुणे**

**देणगी रु. ५,०००/-**

श्री. धनंजय जनार्दन शहाणे यांनी दि. १२.७.२०१७ रोजी रु. ५,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**सौ. अनुराधा अरविंद ताविलदार, पुणे**

**देणगी रु. ५,०००/-**

सौ. अनुराधा अरविंद ताविलदार यांनी दि. १५.७.२०१७ रोजी रु. ५,०००/- ची देणगी स्वतःच्या वाढदिवसानिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना पावभाजी व पुलाव देण्यासाठी करण्यात आला.

**देणगी रु. ३,००१/- ते रु. ४,०००/-**

**श्री. चंद्रहास मारुती बहिरट, पुणे**

**देणगी रु. ३,५००/-**


शिवराज बहिरट

श्री. चंद्रहास मारुती बहिरट यांनी दि. ५.७.२०१७ रोजी रु. ३,५००/- ची देणगी चि. शिवराज याच्या १९ व्या वाढदिवसानिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना पावभाजी व पद्यावलीची पुस्तके देण्यासाठी करण्यात आला.

**देणगी रु. २,००१/- ते रु. ३,०००/-**

**तनया अविनाश कर्णिक, पुणे**

**देणगी रु. २,५००/-**

तनया अविनाश कर्णिक यांनी दि. ३.७.२०१७ रोजी रु. २,५००/- ची देणगी स्वतःच्या व चि. शंतनु अविनाश कर्णिक यांचे (दि. ४ जुलै २०१७) वाढदिवसानिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ४ जुलै २०१७ रोजी संध्याकाळी आश्रमीय विद्यार्थ्यांना साबुदाणा खिचडी देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. श्रीकृष्ण रावजी देव व सौ. स्वाती सतिश पोतनीस, पुणे देणगी रु. ३,०००/-**


सुषमा देव

श्री. श्रीकृष्ण रावजी देव व सौ. स्वाती सतिश पोतनीस यांनी दि. ११.७.२०१७ रोजी रु. ३,०००/- ची देणगी कै. सौ. सुषमा श्रीकृष्ण देव (१९ जुलै) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. चिं. पु. रत्नपारखी, मुंबई**

**देणगी रु. ३,०००/-**

श्री. चिं. पु. रत्नपारखी यांनी दि. १२.७.२०१७ रोजी रु. ३,०००/- ची देणगी कै. वडिल (७ ऑगस्ट २०१७) कै. मुलगा (१ फेब्रुवारी २०१८), कै. मातोश्री (२० मार्च २०१८) यांच्या पुण्यस्मरणार्थ प्रत्येकी रु. १,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

**देणगी रु. १,००१/- ते रु. २,०००/-**

**सौ. मंजिरी अरविंद जोशी, पुणे**

**देणगी रु. १,००१/-**

सौ. मंजिरी अरविंद जोशी यांनी दि. ३.७.२०१७ रोजी रु. १,००१/- ची देणगी कै. श्रीमती सुनिती हरी रानडे यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. २.७.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. अरविंद मोरेश्वर जोशी, पुणे**

**देणगी रु. १,००१/-**

श्री. अरविंद मोरेश्वर जोशी यांनी दि. ३.७.२०१७ रोजी रु. १,००१/- ची देणगी कै. श्रीमती शांताबाई मोरेश्वर जोशी यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ५ जुलै २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्रीमती वसुधा वसंत परचुरे, पुणे**

**देणगी रु. १,००१/-**


वसंत परचुरे

श्रीमती वसुधा वसंत परचुरे यांनी दि. ३.७.२०१७ रोजी रु. १,००१/- ची देणगी कै. वसंत परचुरे यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना आषाढी एकादशी रोजी फराळासाठी करण्यात आला.

**श्री. महेश नंदकुमार डेंगळे, (मा. वि.), पुणे**

**देणगी रु. २,०००/-**

श्री. महेश नंदकुमार डेंगळे यांनी दि. ३.७.२०१७ रोजी रु. २,०००/- ची देणगी स्वतःच्या ५२ व्या वाढदिवसानिमित्त दिलेली आहे.

**श्री. एम. एम. देव, मुंबई**

**देणगी रु. १,५००/-**

श्री. एम. एम. देव यांनी दि. ४.७.२०१७ रोजी रु. १,५००/- ची देणगी नातू चि. रुधान हा ११ महिन्यांचा झाला त्या निमित्ताने दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांसाठी दूध व धान्य आणण्यासाठी करण्यात आला.

**श्री. सुरेश कृष्णाजी भावे, पुणे**

**देणगी रु. २,०००/-**

श्री. सुरेश कृष्णाजी भावे यांनी दि. ५.७.२०१७ रोजी रु. २,०००/- ची देणगी वडिल कै. कृष्णाजी नारायण भावे यांचे स्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ५ जुलै २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना आंबा बर्फी देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. विद्याधर चंद्रकांत उपाध्ये, पुणे**

**देणगी रु. २,०००/-**

श्री. विद्याधर चंद्रकांत उपाध्ये यांनी दि. ८.७.२०१७ रोजी रु. २,०००/- ची देणगी आई कै. हेमलता चंद्रकांत उपाध्ये यांच्या श्राद्धानिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १७ जुलै २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**सौ. शितल कालेकर, पुणे**

**देणगी रु. १,००१/-**

सौ. शितल कालेकर यांनी दि. १०.७.२०१७ रोजी रु. १,००१/- ची देणगी नागपंचमीनिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. २७.७.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. श्रेयस विश्वास उदगावकर, पुणे**

**देणगी रु. २,०००/-**

श्री. श्रेयस विश्वास उदगावकर यांनी दि. ११.७.२०१७ रोजी रु. २,०००/- ची देणगी आजोबा कै. विद्याधर रामचंद्र उदगावकर (१६ जुलै) व वडिल कै. विश्वास विद्याधर उदगावकर (१८ जुलै) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**मिनाक्षी विष्णु केळकर, पुणे**

**देणगी रु. २,०००/-**



विष्णु केळकर

मिनाक्षी विष्णु केळकर यांनी दि. १२.७.२०१७ रोजी रु. २,०००/- ची देणगी वडिल कै. विष्णु हरी केळकर (आषाढ वद्य १०) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. सदाशिव सखाराम पेंडसे, ठाणे**

**देणगी रु. १,००१/-**

श्री. सदाशिव सखाराम पेंडसे यांनी दि. १५.७.२०१७ रोजी रु. १,००१/- ची सदिच्छा देणगी दिलेली आहे.

**श्री. द. ब. शिंदे, पुणे**

**देणगी रु. ५००/-**

श्री. द. ब. शिंदे यांनी दि. १.७.२०१७ रोजी रु. ५००/- ची देणगी स्वतःच्या वाढदिवसानिमित्त दिलेली आहे. सदर देणगी पूर्वीच्या मा. वि. विद्यार्थी निधीमध्ये समाविष्ट करुन येणाऱ्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी संस्थेच्या पुणे व नाशिक शाखेतील गरीब, गरजु, हुशार विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी करण्यात येईल.

**श्रीमती पुष्पा धोंगडे, पुणे**

**देणगी रु. १,०००/-**

श्रीमती पुष्पा धोंगडे यांनी दि. १.७.२०१७ रोजी

रु. १,०००/- ची देणगी कै. कृष्णाजी रामचंद्र वाघमारे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ५ जुलै २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**वैजयंती व्ही. दांडेकर, रायगड**

**देणगी रु. ५००/-**

वैजयंती व्ही. दांडेकर यांनी दि.४.७.२०१७ रोजी रु. ५००/- ची देणगी पितृ स्मरणार्थ दिलेली आहे.

**श्री. विनय बाळकृष्ण मुंडी, पुणे**

**देणगी रु. १,०००/-**



वंदना मुंडी

श्री. विनय बाळकृष्ण मुंडी यांनी दि. ४.७.२०१७ रोजी रु. १,०००/- ची देणगी कै. सौ. वंदना विनय मुंडी यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग शिशुनिकेतन मधील इ. १ ली ते ४ थी च्या आई किंवा वडिल नसलेल्या गरीब, गरजु मुलीला शैक्षणिक मदत देण्यासाठी दिलेली आहे.

**श्री. शरद केशव पंडित, पुणे**

**देणगी रु. ५००/-**

श्री. शरद केशव पंडित यांनी दि. ७.७.२०१७ रोजी रु. ५००/- ची देणगी वडिल कै. केशव दत्तात्रय पंडित यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ७ जुलै २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. सुरेश भागिरथ भुतडा, पुणे**

**देणगी रु. ५००/-**

श्री. सुरेश भागिरथ भुतडा यांनी दि. १३.७.२०१७ रोजी रु. ५००/- ची देणगी कै. नंदकिशोर भागिरथ भुतडा यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १४.७.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. यशवंत प्रभाकर दुनाखे, पुणे**

**देणगी रु. १,०००/-**

श्री. यशवंत प्रभाकर दुनाखे यांनी दि. १५.७.२०१७ रोजी रु. १,०००/- ची देणगी कै. जयंत प्रभाकर दुनाखे यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १६.७.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**देणगी रु. ५००/- खालील सर्व**

श्री. सुहास नारायण दाते, पुणे रु. १०१/-, सौ. प्रज्ञा शिरिष सहस्रबुद्धे, पुणे रु. १०१/-, श्री. शरद रामकृष्ण जोशी, पुणे रु. १०१/-, श्री. राजेंद्र हेरंब भागवत, पुणे रु. २५१/-, श्री. डी. एम. पळणीटकर, पुणे, रु. १००/-, श्रीमती प्रमिलादेवी प्रतापसिंह राजेघाटगे, पुणे रु. १००/-, श्री. मधुकर सोनबा लष्करे, पुणे रु. २५१/-, श्री. सुहास भालचंद्र जोशी, रु. २५१/-; श्री. विजयकुमार जगन्नाथ जोशी, पुणे रु. ५१/-; श्री. अमरेंद्र प्रभाकर गोरे, पुणे रु. ४००/-

**वस्तुरूप देणगी मुल्य रु. अंदाजे**

कु. अनघा वर्मा, पुणे, गहु ४ कि., रु. १४०/-; श्री. केतन मिलिंग मिरजकर, पुणे, वह्या फुलस्केप २२ नग जुन्या व ५ लहान वह्या, रु. १५०/-; श्री. वसंत कुलकर्णी, पुणे, नारळ ७० नग, रु. ७००/-; पार्वती नंदन श्री बाभळे गणपती देवालय चतुर्शिंगी, नारळ १०० नग, रु. १०००/-; डॉ. पौर्णिमा बी. शेट्टी, पुणे, स्पेशल मोतीचूर लाडू १३० नग, रु. २,०००/-; श्रीमती प्रमिलादेवी प्रतापसिंह राजेघाटगे, पुणे १० बिस्कीट पुडे, रु. ११०/-; श्री. प्रकाश शिवमुर्ती गडकरी, पुणे रवा ४ कि., रु. १२०/-

**स्मृतीदिन**

**सर्व कै.**

श्रीमती सरस्वती माणकीकर, भालचंद्र कृष्णाजी नवरे, कु. विद्या सदाशिव फाटक, सौ. लक्ष्मीबाई वामन ब्रह्मे, डॉ. व्ही. एम. भावे, सौ. सुधा राजाराम भागवत, गजानन नागेश मेढेकर, सौ. लीला मधुकर गंगापूरकर, सुधा बा. जोशी, विष्णु गणेश महाबळ, रुक्मिणीबाई श्रीधर हिंगे,

